विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शुक्रवार दि. ८ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

सुविचार
चाहे कोई व्यक्ति कितना भी बुरा हो, उसमें कोई न कोई गुण अवश्य होता है।
(ब्रह्मकुमारीज)

पंतप्रधान नरेंद्र मोदी काश्मीरमध्ये

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरूवारी जम्मू-काश्मीरचा दौरा करतील. या दौऱ्या दरम्यान ते राज्याला ६४०० कोटी रूपयांच्या विकास परियोजनांची भेट देतील. तसेत १००० तरूणांना नोकरीसाठीचे नियुक्तीपत्रक देतील. पंतप्रधान श्रीनगरच्या बख्शी स्टेडियममध्ये लोकांना संबोधित करतील.

काश्मीरमध्ये कलम ३७० हटवल्यानंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. याआधी २०१९मध्ये नरेंद्र मोदी प्रचारासाठी जम्मू-काश्मीरमध्ये आले होते. पंतप्रधानांच्या दौऱ्यामुळे श्रीनगरमध्ये सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी कडेकोड बंदोबस्त ठेवण्यात आले आहे. भाजपचा दावा आहे की या जनसभेमध्ये २ लाखाहून अधिक लोक सामील होतील.

मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान ७ मार्चला दुपारी १२ वाजता श्रीनगरच्या बख्शी स्टेडियममध्ये पोहोचतील. तेथे ते विकसित भारत विकसित जम्मू-काश्मीर कार्यक्रमात सहभागी होतील. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान जम्मू-काश्मीरमध्ये कृषी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तब्बल ५००० कोटी रूपयांचा कार्यक्रम- समग्र कृषी विकास कार्यक्रम राज्याला समर्पित करतील. अनेक योजनांचा यावेळी शुभारंभ करतील.

याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी तब्बल १००० व्या सरकारी कर्मचाऱ्यांन नियुक्ती पत्र वितरित करतील तसेच विविध सरकारी योजनांच्या लाभार्थींशी चर्चाही करतील. भारतात पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने चलो इंडिया ग्लोबल डायस्पोरा अभियानाची सुरूवात करतील.

सोन्याला झळाळी

जळगाव : सुवर्णनगरी जळगावमधील सराफा बाजारात सोने एकदम वधारले आहे. गेल्या ४८ तासांत सोन्याने २ हजारांची उडी घेतली. जीएसटीसह २४ कॅरेट सोने प्रतितोळा ६६ हजार रुपयांच्या घरात पोहोचले आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या अखेरच्या महिन्यात, मार्चमध्ये सोन्याने धुमाकूळ घातला आहे. लग्नसराई सुरू असताना सोन्याच्या या दमदार खेळीने ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री लागली आहे. मार्च महिन्यात सोन्याने एकदम उसळी घेतली आहे. सोने अजून ७० हजारांचा टप्पा गाठणार असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

जळगावच्या सराफा बाजारात सोन्याने वर्षभरातील नवीन **(पान ७ वर)**

मुंबईत आता झीरो प्रिस्क्रिप्शन पॉलिसी

मुंबई : मुंबईतील वरळी भागातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरळी अभियांत्रिकी संकुलाजवळ स्थित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सकाळी साडे अकराच्या सुमारास अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी दवाखान्याची पाहणी करतानाच तपासणीसाठी आलेल्या रुग्णांशी देखील संवाद साधला.

मुंबईकरांच्या आरोग्य उपचारावरील खर्च कमी करण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. आरोग्य आपल्या दारी मोहीम सुरू करण्यात आली असून या मोहिमेतून घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. एप्रिल पासून झिरो प्रिस्क्रीप्शन पॉलिसी देखील सुरू करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वरळीतील अभियांत्रिकी संकुलातील आपला दवाखान्यात मुख्यमंत्र्यांचे अचानक आगमन झाले. त्यांनी दवाखान्यातील, स्टोर रूम, औषध कक्ष, तपासणी खोली, स्वच्छता गृह यांची पाहणी केली. यावेळी तेथे तपासणीसाठी आलेल्या काही ज्येष्ठ नागरिकांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधत आपल्या दवाखान्याविषयी अनुभव विचारला. रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबईकरांना उपचारासाठी घराजवळच सोय व्हावी या संकल्पनेतून आपला दवाखाना मुंबईत २२६ ठिकाणी सुरू करण्यात आले आहेत. आतापर्यंत ४२ लाख नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे. याठिकाणी उपचार मोफत, कॅशलेस, पेपरलेस मिळत आहेत.

मुंबईत आरोग्य आपल्या दारी मोहिमेतून घरोघरी आरोग्य तपासणी केली जाणार आहे. झीरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी एप्रिल पासून सुरू होणार आहे. त्यासाठी १५०० कोटी रुपयांची तरतूद केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी मुंबई शहर जिल्हा पालक मंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्हा पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, **(पान ७ वर)**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष थोडक्यात बचावले

किव : रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध अद्यापही थांबलेले नाही. दोन्ही देशांचे राष्ट्राध्यक्ष अतिशय आक्रमक पद्धतीने बाबी हाताळताना दिसत आहेत. तशातच ताज्या मिळालेल्या माहितीनुसार, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदिमीर झेलेन्स्की हे मिसाईल हल्ल्यातून थोडक्यात बचावल्याचे सांगितले जात आहे. झेलेन्स्की यांच्या ताफ्याच्या अगदी जवळ सुमारे ५०० अंतरावर रशियाने सोडलेले एक मिसाईल पडल्याचे सांगण्यात येत आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की हे ग्रीसचे राष्ट्राध्यक्ष व शिष्टमंडळ यांच्यासोबत असताना हा प्रकार घडला. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पहिल्यांदाच झेलेन्स्कीच्या इतक्या जवळ क्षेपणास्त्र हल्ला झाला आहे.

गेल्या महिन्यातच रशिया-युक्रेन युद्धाला दोन वर्षे पूर्ण झाली. अनेक प्रयत्न करूनही दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित झालेली नाही. दर काही दिवसांनी ड्रोन हल्ले आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या बातम्या सतत येत आहेत. त्यातच मिळालेल्या माहितीनुसार, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष आणि ग्रीसचे पंतप्रधान ओडेसामध्ये भेटणार होते. पण जेव्हा राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांचा ताफा ग्रीक दूतावासात पोहोचला तेव्हा जवळपास ५०० मीटर अंतरावर क्षेपणास्त्र हल्ला झाला. दरम्यान, **(पान ७ वर)**

शेतकऱ्यांना आता दिवसाहि वीज मिळणार

मुंबई : महाराष्ट्रातील शेतक-यांना आता दिवसा देखील वीज मिळणार आहे. त्यामुळे रात्री-अपरात्री शेतीचे पंप सुरु ठेवण्यासाठीचा खटाटोप संपणार आहे. शेतक-यांना दिवसा थ्री फेज वीज मिळत नाही. त्यामुळे त्यांना रात्रीच्या वेळी शेतीला पाणी पुरवठा करावा लागतो. रात्रीच्या वेळी शेताकडे जाताना बिबटे अन्य जनावरांकडून शेतक-यांवर हल्ला होण्याच्या घटनामध्ये वाढ झाली आहे. यामुळे दिवसाचा संपूर्ण क्षमतेने वीज पुरवठा करण्याची मागणी होत आहे.

आता सरकारने राज्यातील कृषी क्षेत्रासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दिवसाचा देखील वीज पुरवठा पुरेशा क्षमतेने होणे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना २.० सुरु करण्यासाठी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हुडको सोबत करार करण्यात आला.

राज्यातील शेतक-यांसाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे. आज शेतक-यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ९००० मे. वॅटच्या कामाचे देकार पत्र जारी करण्यात आले. मुख्यमंत्री सौर कृषि वाहीनी योजना २.० अंतर्गत ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

२५ हजार रोजगार निर्मिती

राज्यात दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषि वाहीनी योजना २.० योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेत ४० हजार कोटीची गुंतवणूक होऊन २५ हजार रोजगारांची निर्मिती होणार आहे. तसेच साल २०२५ मध्ये ४०% कृषी फिडर सौर ऊर्जेवर येणार आहेत. १८ महिन्यात प्रकल्प पूर्ण करायचा आहे. पण सोबत काम केले तर १५ महिन्यात देखील काम पूर्ण होईल असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. शेतक-यांना या योजनेत १.२५ लाख रुपये प्रति हेक्टर वार्षिक भाडे मिळणार आहे. उद्यापासून उर्वरित कृषि फिडर सौर ऊर्जेवर कसे येतील, याचे नियोजन सुरू करा, आता थांबू नका असे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. शेतकऱ्यांना ८ लाख सौर ऊर्जा पंप सुद्धा द्यायचे आहेत असे त्यांनी सांगितले.

दिल्लीकरांना २०० युनिटपर्यंत वीज मोफत

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत अरविंद केजरीवाल सरकार आल्यापासून गेल्या ९ वर्षांपासून लोकांना वीज बिलात सवलत दिली जात आहे. ही सवलत भविष्यात कायम राहणार की नाही? याबाबत आज दिल्ली मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह मंत्री सौरभ भारद्वाज, आतिशी, इम्रान हुसैन, कैलाश गेहलोत, गोपाल राय आणि राजकुमार आनंद उपस्थित होते.

या बैठकीत २०० युनिटपर्यंत मोफत वीज यापुढेही म्हणजेच पुढील वर्षापर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याच धर्तीवर दिल्लीतील लोकांना पूर्वीप्रमाणे ४०० युनिटपर्यंतचे निम्मे बिल भरावे लागणार आहे. या मुद्यावर सरकारने आज तातडीची बैठक बोलावली होती. दरम्यान एक महिन्यापूर्वी, केजरीवाल सरकारने दिल्लीतील लोकांसाठी नवीन सौर धोरण आणले होते, ज्या अंतर्गत सरकार त्यांच्या घराच्या छतावर सौर पॅनेल बसविणा-या लोकांना मोफत वीज देण्याची तयारी करत आहे. **(पान ७ वर)**

सट्टेबाजी आणि जुगाराला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींवर कारवाई होणार

नवी दिल्ली : सट्टेबाजी आणि जुगार यासारख्या बेकायदेशीर कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या वाढत्या जाहिरातींच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने व्यापक सल्लात्मक सूचना जरी केल्या आहेत. विविध कायद्यांतर्गत निषिद्ध असलेल्या बेकायदेशीर कृत्यांच्या जाहिराती, प्रोत्साहन आणि समर्थन यांच्या प्रतिबंधावर या सल्लात्मक सूचनांमध्ये ग्राहक संरक्षण कायदा, २०१९च्या अनुषंगाने, भर देण्यात आला आहे.

सार्वजनिक जुगार कायदा, १८६७ अंतर्गत सट्टेबाजी आणि जुगार खेळण्यास सक्त मनाई आहे आणि देशभरात बहुसंख्य ठिकाणी ही बेकायदेशीर कृत्ये मानली जातात. तरीसुद्धा ऑनलाईन बेटिंग प्लॅटफॉर्म्स आणि एप्स खेळाच्या नावाखाली तसेच थेट सट्टेबाजी आणि जुगाराच्या जाहिराती नेमाने करत आहेत. अशा कृत्याच्या समर्थनाचे मोठे सामाजिक-आर्थिक परिणाम होतात. विशेषतः युवा पिढीवर या बाबींचे मोठे दुष्परिणाम होतात. सट्टेबाजी आणि जुगार प्लॅटफॉर्म्सना प्रसिद्धी देण्यापासून, विविध माध्यम मंचांना सावध करून विविध सूचना जरी करण्याच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या प्रयत्नांना या सल्लात्मक सूचना अधोरेखित करतात. ऑनलाईन जाहिरातींच्या मध्यस्थांनाही अशा जाहिरातींसाठी भारतीय प्रेक्षकांना लक्ष्य करण्याविरुद्ध इशारा देण्यात आला आहे.

विद्यमान कायद्यांतर्गत प्रतिबंधित सेवा किंवा उत्पादनाच्या जाहिरातीला स्पष्टपणे प्रतिबंध घालणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींचे समर्थन प्रतिबंध मार्गदर्शक सूचना २०२२, या सल्लात्मक सूचनांमध्ये अधोरेखित करण्यात आल्या आहेत. माध्यम कुठलेही असो, या मार्गदर्शक सूचना सर्व जाहिरातींना लागू होत असल्याचा पुनरुच्चार या सल्लात्मक सूचनांमध्ये करण्यात आला आहे. ऑनलाईन जुगार आणि सट्टेबाजीच्या जाहिराती किंवा **(पान ७ वर)**

ऋषिकेश कराड यांना नवभारत ॲचिव्हर्स ॲवॉर्ड

दुबईत ९ मार्च रोजी होणार पुरस्कार वितरण समारोह

लातूर : सिल्क रेलिंग उद्योगात स्वत:ची पदचिन्हे उमटवून नवउद्योजक म्हणून ख्याती प्राप्त केलेले ऋषिकेश रमेश कराड यांना नुकताच नवभारत ॲचिव्हर्स ॲवॉर्ड हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मान घोषित झाला असून, येत्या ९ मार्च रोजी दुबईच्या राजघराण्यातील मान्यवरांच्या हस्ते त्यांना तो हयात रिजेन्सी या पंचतारांकित हॉटेलच्या भव्य कॉन्फरन्स हॉल येथे प्रदान केला जाणार आहे. उद्योग क्षेत्राबरोबरच ऋषिकेशदादा

गीर गाईंच्या दूध डेअरीमध्ये लक्षणीय कामगिरी दाखवत आहेत.

आपल्या कर्तृत्वातून त्यांनी लातूर येथील एमआयएमएसआर मेडिकल कॉलेजमध्ये मानव संसाधन कार्यकारी अधिकारी म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. रामेश्वर (लातूर) येथील संत गोपाळबुवा महाराज शुगर ॲण्ड ॲग्रो फूड इंडस्ट्रीजचे ते संस्थापक संचालक असून, वायुपुत्र श्री हनुमान व्यायामशाळेचे (रामेश्वर) ते सल्लागार आहेत. लातूर येथील श्री धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणून काम पाहत असतानाच राजकारणाच्या क्षेत्रातही त्यांची आगेकुच सुरू आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे ते **(पान ७ वर)**

देशातील तरुणांना राहुल गांधींची ५ आश्वासने

नवी दिल्ली : निवडणूक जवळ आल्यावर राजकीय पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध आश्वासने दिली जातात. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान देशातील तरुणांना उद्देशून मोठ्या घोषणा केल्या आहेत. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी गुरुवार दि. ७ मार्च रोजी राहुल गांधींच्या पाच आश्वासनांची यादी सोशल मीडियावर शेअर केली.

राहुल गांधी म्हणाले की काँग्रेस सत्तेत आल्यानंतर पहिले पाऊल म्हणजे, भारतात ३० लाख सरकारी जागा रिक्त आहेत. पीएम मोदी त्या जागा भरुन काढणार नाहीत. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही त्या ३० लाख सरकारी नोक-या देण्याचे काम करू. ते पुढे म्हणाले की, दुसरी गोष्ट म्हणजे मनरेगाचे अधिकार आम्ही दिले होते. त्याचप्रमाणे आम्ही भारतातील सर्व तरुणांना शिकाऊ अप्रेंटिसशिपचा अधिकार देणार आहोत. प्रत्येक पदवीधर तरुणाला हा अधिकार मिळेल. कॉलेज डिप्लोमानंतर प्रत्येक पदवीधराला सरकारी कार्यालय आणि खासगी कंपनीत एक वर्षाची अप्रेंटिसशिप आणि त्यासोबत एक लाख रुपये दिले जातील. कॉलेज पूर्ण केल्यानंतर तात्काळ हा हक्क मनरेगाच्या हक्कासारखा मिळेल.

कोणती आहेत काँग्रेसची आश्वासने?

१. भरतीचे आश्वासन : सत्ता आल्यानंतर काँग्रेस पक्ष केंद्रात ३० लाख नोक-या देणार. आम्ही एक कॅलेंडर जारी करू आणि त्यानुसार भरती प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने पूर्ण करू. **(पान ७ वर)**

महिला कर्मचाऱ्यांचा महिला दिनानिमित्त सन्मान

लातूर / प्रतिनिधी उन्हाळा असो की पावसाळा प्रत्यक्ष फिल्डवर जावून, विविध आव्हानांचा सामना करीत आपली सेवा बजाविणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा आज जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करण्यात आला. निमित्त होते जागतिक महिला दिनाचे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात स्वच्छता कामगार ते कोतवाल, आशा सेविका अशा विविध पदांवर काम करणाऱ्या महिलांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली.

शासकीय सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना आपली शासकीय कर्तव्य आणि कौटुंबिक जबाबदारी पार पडताना अनेकदा संघर्षमय परिस्थितीला सामोरे जावे लागते. तसेच या धावपळीत त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे महिलांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती व्हावी आणि त्यांच्या कामाची दखल घेवून त्यांचे कौतुक करण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध शासकीय विभागांतर्गत फिल्डवर काम करणाऱ्या महिलांचा प्रातिनिधिक स्वरुपात गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, प्रा. अंजली जोशी टेंभूर्णीकर, कस्तुरी सोमय मुंडे, आहारतज्ज्ञ डॉ. सुवर्णा बिराजदार, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संगीता टकले, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा कोषागार अधिकारी **(पान ७ वर)**

गवळी समाजाच्या दुग्धाभिषेकाने होणार ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेचा शुभारंभ

महिला दिनानिमित्त विविध उपक्रम

यावर्षी योगायोगाने जागतिक महिला दिनी दि.८ मार्च रोजी यात्रा महोत्सवाचा शुभारंभ होत आहे.त्यामुळे देवस्थानच्या वतीने विविध विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. लातूरच्या पहिल्या महिला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते झेंडावंदन होणार आहे.याशिवाय महिला तक्रार निवारण केंद्राचा शुभारंभ होणार आहे.प्रथमच महिला जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्रींची महापूजा संपन्न होणार आहे.

लातूर/ प्रतिनिधी: लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या यात्रा महोत्सवास गुरुवार व शुक्रवारच्या मध्यरात्री १२ वाजता गवळी समाजाच्या दुग्धाभिषेकाने प्रारंभ होणार आहे.यंदा यात्रा महोत्सव १७ दिवस चालणार असून देवस्थानच्या वतीने उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर देवस्थानचा यात्रा महोत्सव मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी विविध भागातून नागरिक येथे येत असतात.शुक्रवार दि.८ मार्च रोजी महाशिवरात्रीनिमित्त भक्तांची मोठी गर्दी होते. मध्यरात्री १२ वाजता परंपरेप्रमाणे गवळी समाजाच्या वतीने श्री सिद्धेश्वरांना दुग्धाभिषेक होतो. त्यानंतर दर्शन खुले केले जाते. महाशिवरात्रीनिमित्त शुक्रवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते श्रींची महापूजा व झेंडावंदन होणार आहे यानंतर माळी भजनी मंडळ व माळी बांधवांकडून मिरवणूक काढत पुष्पवृष्टी संपन्न होईल.शुक्रवारीच श्रीमती सरस्वती कराड रक्त केंद्राच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता गौरीशंकर मंदिरापासून झेंड्याच्या काठींची मिरवणूक निघणार आहे. लातूर शहर व परिसरातील भक्त आणि नागरिकांनी यात्रा महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर व देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. गुरुनाथ बाबू आप्पा पुणे यांचे दुःखद निधन

अहमदपूर दि.०७(प्रतिनिधी) सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. गुरुनाथ बाबू आप्पा पुणे यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सरस्वती विद्यालय कुमठा बुद्रुक येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. गुरुनाथ बाबू आप्पा पुणे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ६ मार्च २०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजता दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक ६ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ५.०० च्या सुमारास अंतिम संस्कार करण्यात आले. सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. गुरुनाथ बाबू आप्पा पुणे यांची या परिसरात विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्याची प्रचिती होती. यशवंत जुनियर कॉलेजचे गणित विषयाचे प्रा. रवीकुमार पुणे यांचे व सोनखेड मानखेड येथील सहशिक्षक अरुण पुणे यांचे ते वडील होते तसेच उपमुख्याध्यापक राजकुमार घोटे यांचे सासरे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अहमदपूर तालुक्यात दहावीच्या परीक्षा सुरळीत

अहमदपूर दि.०७(कारामुंगीकर) अहमदपूर तालुक्यात एस.एस.सी. बोर्ड, दहावी परीक्षा सुरळीत चालु आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षा आज दि.१ मार्च पासून सुरूवात झाले असून अहमदपूर परिसरात उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० बोर्ड परीक्षा) केंद्रावर परीक्षा सुरळीत चालू आहेत.

एस.एस.सी.बोर्ड परीक्षा सुराळीत पार पडण्यासाठी केंद्रप्रमुखांना योग्य ती सूचना बैठकीत देण्यात आली.परिरक्षक कार्यालय,गट साधन केंद्र अंतर्गत तालुक्यातील परीक्षा केंद्रावर परिरक्षक कार्यालयांतर्गत २५४४ विद्यार्थी दहावीची परीक्षा देत आहे.

सदरील परीक्षा यशवंत विद्यालय अहमदपूर ३४७ विद्यार्थी, महात्मा फुले ३५०, विमलाबाई देशमुख २५०, रविद्रनाथ टागोर ३४९, जि.प.प्रशाला काजळहिप्परगा १३९, पोस्ट बेसिक आश्रम शाळा ढाळेगाव २३५, आहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय सांगवी २७६, परशुराम विद्यालय मोघा १४३, आहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय अहमदपूर २४९, कमला नेहरु विद्यालय अहमदपूर २०६ विद्यार्थी असे एकूण २५४४ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परिरक्षक क्र.(CU १३८) अहमदपूर येथिल मुख्य परिरक्षक जि.प.प्रशाला अहमदपूरचे मुख्याध्यापक अफरोज सिद्दिकी, उप.परिरक्षक रमाकांत बिलापट्टे , सह सहाय्यक परिरक्षक (रनर) म्हणून सुनिल आंधुरे, सुधीर भोसले, केंद्रे विवेक,मुंडे कृष्णा, किनकर सोमनाथ, मंगेश कासले प्रा.शेळके, तानाजी केंद्रे, वडवळे सर, थोरात सर, गळगे सर, मच्छिंद्र फाजगे, युवराज पाटील ,स्वामी सर, शेख सर.UID लावणार सय्यद इकबाल अहेमद, सेवक एम.एम.पठाण सह परीक्षा सुरळीत होण्यासाठी योग्य पद्धतीने नियोजन केले आहे.

यावेळी प्रत्यक्ष परीक्षा सुरु असताना संबंधित परीक्षा केंद्रावर काही गैर प्रकार घडत असल्यास बैठे पथक, सहायक परिरक्षक (रनर) यांनी इमारतीच्या परीसराचे व परीक्षा दालनाच्या बाहेरील परीसरांचे आवश्यकतेनुसार व्हिडीओ चित्रिकरण करण्यासाठीचे सक्त सूचना दिले गेले आहेत.बाहेरच्या परीसरातून परीक्षा केंद्रावर काही गैरप्रकार घडत असेल तर तात्काळ कार्यवाहीसाठी क्षेत्रीय अधिकारी, विभागीय सचिवांना अवगत करण्यात येणार आहे.

परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथक आणि महिलांचे विशेष पथक परीक्षा केंद्रावर तैनात केले आहे.

फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहा

योगरत्न सहराज्य प्रभारी आ. संजीवनी ताई माने

चाकूर दि.०७(प्रतिनिधी) आजच्या आधुनिक युगात मानव अपेक्षेशिवाय कार्य करावयास तयार नाही. यासाठी अपेक्षा बाळगली की दुःख मिळणारचं. यासाठी फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहा असे प्रतिपादन योगरत्न सहराज्य प्रभारी आ. संजीवनी ताई माने यांनी केल्या.

त्या चाकूर येथे महिला पतंजलीच्या बैठकीत बोलत होत्या. सदरील बैठक सहराज्य प्रभारी आ. संजीवनी ताईंच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.

पुढे बोलताना संजीवनी ताई म्हणाल्या की, योगाने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते,सुदृढ शरीरात सुदृढ मन राहते, महिलांनी नेहमीच सकारात्मक विचार केला पाहिजे. महिलांनी अर्धा तास तरी स्वतःसाठी वेळ दिला पाहिजे. स्वतः योग साधना करा व दुसऱ्यांनाही योग शिकवा, असा मोलाचा संदेश ताईंनी सर्व महिलांना दिला.

सदरील बैठकीचे प्रास्ताविक संवाद प्रभारी योगशिक्षीका सौ. कलावतीताई भातांब्रे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि स्वागत गीताने झाली. आ. संजीवनी ताईंनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकला केंद्रे यांनी केले, तर जिल्हा प्रभारी सुमन पवार यांनी आभार व्यक्त केले. यावेळी शहरातील महिला प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. ज्या महिला नित्य योग वर्ग चालवतात त्या महिलांचा पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सदरील कार्यक्रमासाठी प्रभा मोतीपवळे , महानंदा येमले, नारागुडे, कविता झांबरे , डॉ. अंजली स्वामी, विमल राठोड , राजश्री किने, चंदिले ताई, धनशेट्टी ताई, सुनंदा हीपाळे , सुषमा सोनटक्के, पूजा इजारे, रत्नमाला नंदागवळे, दिपाली शिंदाळकर, सुषमा पाटील, वैशाली मोरे ,स्वामी, कदम, प्रिया मोरे, पांचाळ ताई यांनी विशेष परिश्रम घेतले.

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाचे रासेयो शिबिराचे समारोप समारंभ संपन्न

हडोळती दि.०७(नागसेन गायकवाड) कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाचे रासेयो शिबिराचे समारोप समारंभ संपन्न झाले.

याबाबत अधिक माहिती अशी की, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष शिबिर युवकांचा ध्यास: ग्राम - शहर विकास मौजे हंगरगा तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथे दि . २२ ते २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत संपन्न झाले. रोजी समारोप समारंभ संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष आदरणीय प्रा . पी .टी .पवार सर तर प्रमुख पाहुणे म्हणून रासेयोचे विभागीय समन्वयक मा . डॉ . भारत भदाडे सर हे उपस्थित होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून गावच्या सरपंच मा . त्रिवेणीबाई पवार ,चेअरमन मा. शिवाजी पवार ,कार्यकारी सरपंच शिवाजी पवार ,ग्रामसेवक मा. मारुती गायकवाड , सामाजिक कार्यकर्ते मा.विनायक पवार, मा . विजय पवार, तंटामुक्ती अध्यक्ष जयराम पवार, एकमतचे पत्रकार रामदास जाधव व समस्त ग्रामस्थ उपस्थित . याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ . भदाडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला तर अध्यक्षीय समारोपात मा . प्रा . पी . टी . पवार सर म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावचा शहराचा व राष्ट्राचा विकास साधला जातो त्याचबरोबर मनुष्य स्वावलंबी बनतो .सेवावृत्ती विकसित होते . हे विचार त्यांनी मांडून शिबिरकाळात गावात राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी गावकऱ्यांनी शिबिर काळात स्वयंसेवकांनी केलेल्या श्रमदान उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले . याप्रसंगी प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ . सादिक शेख यांनी केले व सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ . गोविंद शिळे यांनी केले .तर आभार डॉ . मनोज पवार यांनी मानले. यावेळी स्वयंसेवक स्वयंसेविका तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

आज अहमदपूरात मास सेनेच्या वतिने बैठकीचे आयोजन

समाजबांधवाना उपस्थित राहण्याचे आवाहन

अहमदपूर दि.०५(कारामुंगीकर) मास अर्थात मातंग अस्मिता संघर्ष सेना शाखा अहमदपूरच्या वतिने बैठकीचे आयोजन करण्यात येवून समाजबांधवाना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील मास अर्थात मातंग अस्मिता संघर्ष सेना, शाखा अहमदपूरच्या वतिने बैठकीचे आयोजन दि. ८ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय विश्राम गृह अहमदपूर येथे करण्यात आले असुन समाजातील सर्व संघटना तसेच समाज बांधव यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच या बैठकीत नविन कार्यकारणीची निवडही करण्यात येणार आहे.

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ सूर्यवंशी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सूर्यकांत त्तादलापूरकर, उपाध्यक्ष जगदीश सोनटक्के, सचिव पंडित हनुमंते, मराठवाडा अध्यक्ष नितीन दादा तलवारे, फाउंडेशन मेंबर महाराष्ट्र राज्य कुरुपेश सूर्यवंशी उदगीर तालुका अध्यक्ष किरण सूर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी मातंग समाजातील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी सदस्य चेअरमन, लहुजी कर्मचारी संघटनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, लहुजी शक्ती सेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यरत असलेल्या सर्व संघटनेच्या मातंग समाजातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन मधुकर मरीबा इबीद्रे यासह मास शाखा, अहमदपूरच्या वतिने करण्यात आल आहे.

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो

मतदार जनजागृती रँलीने अहमदपूर दुमदुमले

अहमदपूर दि.०७ (कारामुंगीकर) अहमदपूर शहरातील मुख्य रस्त्यावरुन मतदार जनजागृती रँली काढण्यात आली होती. मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या तरुणाईच्या तोंडुन जोशमध्ये होणाऱ्या घोषणांनी अहमदपूर शहर दुमदुमले.

याबाबत अधिक माहिती अशी की, तहसील कार्यालय अहमदपूरच्या वतीने दि. ६ मार्च रोजी सकाळी ९ वा. यशवंत विद्यालय अहमदपूर येथून मतदार रॅलीला हिरवी झेंडा दाखवून अहमदपूरचे तहसीलदार शिवाजी पालेपाड, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख नंदकुमार कोनाले यांनी जनजागृती रँलीची सुरुवात केली.

यावेळी यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन शिंदे यांनी सहभागी विमलाबाई देशमुख कन्या शाळा,रविद्रनाथ टागोर विद्यालय,नुतन मराठी विद्यालय,मौलाना आझाद उर्दू शाळाव यशवंत विद्यालय येथिल शेकडो विद्यार्थी व शिक्षक बांधवांचे ,तहसील कार्यालयातील कर्मचारी बांधवांचे, उपस्थितीत सर्व मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

उपविभागीय अधिकारी प्रविण फुलारी, तहसीलदार शिवाजी पालेपाड नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाने जिल्हयातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी व पारदर्शक निवडणूक होण्याकरीता मतदारांना स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृती करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे सदस्य महादेव खळुरे,शिवकुमार गुळवे, मोहन तेलंग, बस्वेश्वर थोटे,चंद्रकांत पेड, पुरुषोत्तम काळे, श्रीमती अर्चना माने, नागनाथ स्वामी, कपिल बिरादार, प्रा.शिवशंकर पाटील यांचे सहकार्य लाभले.

जनजागृती रँली शहरातील महात्मा बस्वेश्वर चौक, छ.शिवाजी महाराज चौक, आझाद चौक, हणुमान मंदिर, बाबासाहेब आंबेडकर चौक, सावरकर चौकातून मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो. मतदानासाठी वेळ काढा , आपली जबाबदारी पार पाडा. ना जातीवर ना धर्मावर ,बटन दाबा कार्यावर. आधी मतदानाचे नंदनवन, नंतर सेवेचे आनंदवन. चला मतदान करू या , देशाची प्रगती घडवू या.... चला मतदान करू या , देशात लोकशाही रुजवू या....असे मोठ्या आवाजाने घोषणा देत तहसील कार्यालयात रँलीचे सांगता करण्यात आले.उपस्थितीत शिक्षक व विद्यार्थ्यांचे तहसीलच्या वतीने गुलाब पुष्प देवून तहसीलदार साहेबांनी स्वागत केले.तालुक्यातील विविध गावात स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात येणार आहे.मतदानाचा हक्क बजावा तसेच मतदानासाठी दिलेली सुट्टी साजरी न करता त्याचा मतदानासाठी उपयोग करा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.तहसील कार्यालयातर्फे आयोजित या मतदान रॅलीला उत्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार मुनवर मुजावर सहायक प्रल्हाद रिठे, नोडल अधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख नंदकुमार कोनाले, हरिषचंद्र शेकडे, गौरव चवंडा, विवेकानंद हुडे आदिने परिश्रम घेतले.

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, अहमदपूर यांचे कार्यालयात

जन्म-२/जन्म/मृत्यु विभाग

जन्म नोंदनी प्रमाणपत्र जाहीरनामा

जा.क्र. २०२४/दंडनीय/कावि २१७ दि.०१.०३.२०२४

विषय : जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

जाहीरप्रगटन

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **अतार नसरीन अय्युब** रा. अहमदपूर, ता. अहमदपूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत त्यांची मुलगी नाव अर्जदार **अतार निलोफर अय्युब** यांचा जन्म दि. १२/०८/१९९९ रोजी मौ. अहमदपूर ता. अहमदपूर येथे राहत्या घरी झाला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी **नगर परिषद कार्यालय, अहमदपूर,** ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि. ०१/०३/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

प्रत : १. **नगर परिषद कार्यालय, अहमदपूर,**ता. अहमदपूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे प्रगटन नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी. अहवाल मुदतीत प्राप्त न झाल्यास आपली काहीही हरकत नाही असे समजुन नियमानुसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल.

२. अर्जदार **अतार नसरीन अय्युब** रा. अहमदपूर, ता. अहमदपूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरच्या जाहीर प्रगटनास दैनिक वृत्तपत्रामध्ये स्वखर्चाने प्रसिद्धी देवून वृत्तपत्र या कार्यालयास सादर करावे.

सही/-

शिक्का

तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर

गटशिक्षणाधिकारी ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचा २ रा टप्पा पूर्ण

अहमदपूर दि.०७(कारामुंगीकर) येथील गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धि प्रशिक्षणचा दूसरा टप्पा पूर्ण झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचा दि. ६ मार्च रोजी दूसरा टप्पा समारोप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामाक्षी पवार ह्या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ. दिलीप मुगळे यांची उपस्थित होती तर यावेळी मंचावर प्रा. डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर, वाघमारे बी.आर, टेकाळे आर. एस., जवळे डी. आर. उंदिरकल्ले सर, श्रीमती पांचाळ एस.बी., तपघाले जे.एस., गाटचेरले पी.व्ही., गुंडरे एस.पी., गिरी जी.डी., श्रीमती बुरगे एस.आर., इत्यादी सुलभक व गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी राम चामे, सोमनाथ केंद्रे, मनिषा गुणाले, रत्नप्रभा मंडलवार आदिंची उपस्थिती होती. दि. २६ ते २८ फे ब्रूवारी दरम्यान प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पुर्ण झाला तर दि. ०४ मार्च ते ६ मार्च दरम्यान प्रशिक्षणाचा दूसरा टप्पा पुर्ण झाला असुन या दोन्ही टप्यात जवळपास एकुण ४०० कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेतले असुन उर्वरित जवळपास २०० शिक्षकांचा तिसरा टप्पा दि. ११ मार्च ते १३ मार्च दरम्यान होणार असुन या टप्यात राहिलेल्या सर्व शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण करुन घ्यावे असे सुचित करण्यात आले आहे.

या पशिक्षणासाठी गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे व राज्य समन्वयक कामाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुलभक, गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी तसेच एस.एस.एम. प्रतिष्ठान येथील प्रल्हाद बुधवारे, शेख गुलाब शुकुर, धम्मा कांबळे यासह कर्मचारी कार्य करत आहेत.

विश्वास हा एका खोडरबरसारखा असतो, तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो.

माझे बाबा....

कधी आपले दुःख न सांगणारा
तो व्यक्ति म्हणजे बाबा....
स्वतःची इच्छा मारुन लेकरांची
इच्छा पूर्ण करणारा तो म्हणजे बाबा....
खुप कष्ट करणारा आपल्या मुलांची स्वप्न पूर्ण
करण्यासाठी दिवस भर
राबणारा तो व्यक्ति म्हणजे बाबा....
स्वतःच्या मनतले दुःख लपवून
सदैव चेहऱ्यावर आनंद ठेवणारा
तो महान व्यक्ति म्हणजे बाबा....
जेथे कोणतेही नवस न करता
सगळ कही मिळवुन देणारा
तो देव म्हणजे बाबा ....
बाबांचं मोठेपन हे शब्दात
न सांगता येणारं
शब्दाहुनही मोठ
आहे बाबांच मोठेपन ....

आरती मंडले,
यशवंत ज्यु. कॉलेज अहमदपूर
९१५६११५५७०

कबीरवाणी

गुरु गुरु मे भेद है,
गुरु गुरु मे भाव
सोई गुरु नीत बंदिये ,
शब्द बतावे दाव

भावार्थ : संत कबीर म्हणतात कि, खरा गुरु कसा ओळखावा. खरा गुरु सहजासहजी ओळखने अवघड आहे. यासंदर्भाने मार्गदर्शन करताताना संत कबीर म्हणतात कि या विश्वात, जगात अनेक गुरु आहेत आणि ते आपल्या आपल्या ज्ञानाचा उपयोग वेगवेगळ्या पद्धतीने करतात. त्या सर्वांमध्ये काहीना काही फरक आहे. अश्यावेळी खरे गुरु कोणते हे कसे ओळखायचे? तर जे गुरु शब्दांमागचे खरे ज्ञान देतात. फक्त पुस्तकी, पोपटपंची न शिकवता आपल्याला त्या शब्दांमध्ये लपलेले अनुभवात्मक ज्ञान देतात तेच खरे गुरु होत. आणि अश्याच गुरूच्या चरणी आपण निष्ठा वाहायला हवी असे संत कबीर सांगतात.

डॉ. बालाजी कारामुंगीकर
मो. ९८२३११२९०७

शिवचरित्राचा पाया मूळात संस्कार आहे

देगलूर(प्रतिनीधी): येथील गोळवलकर गुरुजी विद्यालयात श्री गुरुजी जयंती निमित्त आयोजित व्याख्यानमाला २६ वे पुष्प गुंफतेवेळी प्रसिद्ध शिवचरित्रकार डॉ. बांगर यांनी म्हटले की शिवचरित्राचा पाया हा संस्कार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेन्द्रभाऊ आलुरकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यंकटराव पाटील गोजेगावकर हे होते. प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी केले. यानंतर विद्यालयातील लिपिक गिरीश दीक्षित यांनी व शिक्षक वसंत वाघमारे यांनी वयक्तिक पद्य म्हंटले. प्रमुख वक्ते डॉ. बांगर यांनी म्हटले सांगितले की छ. शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा वेध घ्यावयाचा असेल तर ७०० वर्षा मागे जावे लागेल तेव्हा छत्रपती शिव-ाजी महाराज समजतील १६५५ अब्बास ने काय काय लुटून नेले हे मनामध्ये आहे ४०० क्विंटल सोनं, चांदी,हिरे मोती यापेक्षा सर्वात जास्त लूट केली स्वाभिमानाची ,प्रतिष्ठेची.

तीनशे ते साडेतीनशे वर्षात देवगिरीच्या पडावापासून महाराष्ट्रपर्यंत ६७ सुलतानांनी या महाराष्ट्राची राख रांगोळी केली याचा इतिहास सांगितला. साडेतीनशे वर्षापर्यंत महाराष्ट्र अन्याय अत्याचार अपमानाने चिरडून भरडून निघाला. राजमाता जिजाऊने हे पाहिले होते, कोणतीही स्त्री सुरक्षित नव्हती तेव्हाच त्यांनी ठरवलं माझं राज्य माझा राजा माझी जनता म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करू शकले .

जोपर्यंत सूर्य ,चंद्र ,तारे आहेत तोपर्यंत छत्रपती शिवाजी राजे आहेत त्यांनी शिवाजी या शब्दाची फोड करून शिवचरित्र शिवनीती, शिवतंत्र अशी केली. साडेतीनशे वर्षानंतर महासत्ताक व्हायचे असेल तर शिवचरित्र, शिवनीती व शिवतंत्र हा त्याचा पाया आहे ,राजमाता जिजाऊ शिवबांना घडविले म्हणून शिव-ाजी महाराज घडले, आपले लेकर बिघडण्याच्या आत त्यांना घडवा हीच मुलं उद्या कर्तुत्वान होतील शिवचरित्राचा पाया मुळात संस्कार आहे, राजमाता जिजाऊ यांना डोहाळे लागले होते ते धर्माची स्थापना करण्याचे ध्येय उद्धात्त असली पाहिजे शिवरायाची मुद्रा जगाच्या कल्याणासाठी होती, स्वार्थाने बरबटलेली लोक शिवरायांना साथ दिली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीतील लोकांना घेऊन स्वराज्याचा पहिला भगवा ध्वज फडकवला शिवरायांची बांधिलकी मावळ्यांची नाही-तर भगव्यांशी होती माझ्या मावळ्यांनी माझ्यासाठी लढायचं नाही. लढायचं असेल तर भगव्यासाठी लढा मातीसाठी लढा वेतन नाही पगार नाही राजा नाही तर ही मातीसाठी लढणारी प्रजा होती. कारण शिवरायांची शिकवण त्यांना होती महाराजांची दूरदृष्टी होती नागरी लिपी त्यांनी तयार केली. मुद्रा तयार केली पिढी घडवण्यासाठी मातृभाषेवर प्रेम असले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर तुळजाभवानीचे मंदिर बांधले शिवाजी महाराजांचे मंदिर होऊ नये हे जरी खरं असले तरी महाराज जिवंतपणे देव होऊन गेले हेही तेवढेच खर आहे. असा महान राजा आता होणे शक्य नाही असे ते म्हणाले.

नरापासून वानरापर्यंत वानरा-पासून नारायणापर्यंतचा काळ शिवरायांनी घडवला म्हणून स्त्री सुरक्षित होती हिंदवी स्वराज्यात स्त्रियांचे अपमान करणाऱ्या गुन्हा माफ नव्हता म्हणून स्त्री सुरक्षित होती. ज्या दिवशी तुमच्या घरा-तला मुलगा आदराने स्त्रीकडे पाहिल तेव्हाच प्रत्येक स्त्री सुरक्षित असेल हे आपले संस्कार असावेत असा महान राजा नसला असता तर अंगणातली तुळस आणि मंदिराचे कळस कधीच दिसले नसते अशा प्रकारे डॉ. बांगर यांनी छ. शिवाजी महाराजांचा महत्वपूर्ण इतिहास सांगितला.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ. सुरेन्द्रभाऊ आलुरकर यांनी म्हटले की आज गुरुजींच्या स्मरणाने ही गंगास्नान केल्याचे पुण्य पदरी पडते यांचे विचारांचे जरी वाचन केले तर आयुष्यात अनेक बदल होतात. शिवाजी महाराजांचे स्मरण होते तेव्हा तेव्हा ते आपल्या समोर प्रत्यक्ष उभे असतात. कार्यक्रमात प्रा.गिरीश वझलवार, गिरीशभ गोले, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रा. संजय पाटील , प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष सौ. अटकळीकर , सदस्य भागवत तम्मेवार, हे उपस्थीत होते. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी,पालक- माता पालक, शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.बेजगमवार यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता सौ. तोटावार यांनी पसायदानाने केली.

विरशैव समाज उदगीर च्या वतीने महाशिवरात्री निमित्त प्रवचन

उदगीर (प्रतिनिधी)विरशैव समाज उदगीर च्या वतीने महाशिवरात्री महोत्सव २०२४ निमित्त आज शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२४ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता सद्गुरु हावगी स्वामी मठात प्रार्थना व प्रव-चनाचे आयोजन करण्यात आलेले आहे श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधीश डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात व विरशैव समाज उदगीरचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमास प्रा. डॉ. मल्लेश झुंगास्वामी यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. या प्रार्थना व प्रवचन कार्यक्रमास शिवभक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन समाजाचे सचिव ॲड श्रीकांत बडीहवेली, उपाध्यक्ष प्रमोद शेटकार, सहसचिव बाबुराव हिपळगे, कोषाध्यक्ष सुभाष धनुरे यांनी केले आहे.

पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात बदल उपलब्ध पाणी जपून वापरावे

लातूर/प्रतिनिधी:पुढील आठवड्यापासून शहरात महानगरपालिकेच्या वतीने केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे. यापुढे दर आठ दिवसांनी पाणीपुरवठा होणार आहे. पाण्याचा अपुरा साठा लक्षात घेता शहरातील नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा,असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहराला मनपाकडून दर सातव्या दिवशी पाणीपुरवठा केला जातो.रोटेशननुसार वेगवेगळ्या दिवशी, वेगवेगळ्या विभागात पाणीपुरवठा होतो. आतापर्यंत दर सातव्या दिवशी विविध विभागात पाणीपुरवठा केला जात होता.परंतु उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता आता सात ऐवजी आठ दिवसांनी पाणीपुरवठा केला जाणार आहे. शहरातील नागरिकांना दर आठव्या दिवशी पाणी उपलब्ध होणार आहे. पुढील आठवड्यात मंगळवार दि.१२ रोजी शासकीय जलकुंभ, बसवेश्र्वर जलकुंभ,नांदेड नाका जलकुंभ,आर्वी जलकुंभ व गांधी चौक जल कुंभातून दुपारी २ नंतर पाणीपुरवठा होणार आहे.बुधवार दि.१३ रोजी नांदेड नाका जलकुंभ, आर्वी जलकुंभ,डालडा जलकुंभ व सरस्वती जल कुंभातून त्या-त्या परिसरात पाणीपुरवठा होईल. गुरुवार दि.१४ रोजी नांदेड नाका जलकुंभातून दुपारी १२वाजेपर्यंत, डालडा झुलकुंभातून सकाळी १० वाजेपर्यंत, सरस्वती जलकुंभातून सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच आर्वी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलकुंभातून पाणीपुरवठा होईल.शुक्रवार दि.१५ रोजी मजिप्राच्या जल कुंभावरून दुपारी १२ पर्यंत,गांधीचौक जल कुंभावरून दुपारी २ पर्यंत, राजधानी जलकुंभाद्वारे दुपारी २ नंतर,शासकीय जलकुंभाच्या परिसरात सायंकाळी ५नंतर तर बसवेश्वर जलकुंभातून दुपारी २ वाजेनंतर पाणीपुरवठा केला जाणार आहे. गतवर्षी पावसाळ्यात मांजरा प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा झाला नव्हता. त्यामुळे उपलब्ध पाणी जपून वापरावे लागणार आहे.यामुळे शहरातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे.रस्ता व फरशी धुणे,गाड्या धुणे यासारख्या पद्धतीने पाणी वाया घालवू नये.पाण्याची बचत करावी.पाण्याची नासाडी करू नये.नळास तोट्या बसवाव्या,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक डेव्हिड बाल्टिमोर यांचा वाढदिवस साजरा

लातूर - येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०७ मार्च २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक डेव्हिड बाल्टिमोर यांचा ८६ वा वाढदिवस साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,एस. के.महाविद्यालय,

जळकोट येथील प्रा.संतोष नापते व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी विभागांतर्गत आयोजित कार्यक्रमाचा उद्देश सांगताना यामुळे विद्यार्थ्यांची होणारी जडणघडण याबाबत माहिती दिली.

प्रा.नापते यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांची गरज असून अशाच कार्यक्रमांमधून चांगले वक्ते निर्माण होतात असे सांगितले.वैज्ञानिक डेव्हिड बाल्टिमोर यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बी.टी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी आकांक्षा क्षीरसागर यांनी सांगितली.

डेव्हिड बाल्टीमोर हे अमेरिकन जीवशास्त्रज्ञ,विद्यापीठ प्रशासक आणि १९७५ चे फिजिओलॉजी किंवा मेडिसिनमधील नोबेल पारितोषिक विजेते आहेत. वयाच्या ३७ व्या वर्षी बाल्टिमोर यांनी रेनाटो डल्बेको आणि हॉवर्ड एम.टेमिन यांच्यासोबत ट्यूमर व्हायरस आणि सेलच्या अनुवांशिक सामग्रीमधील परस्परसंवादाबद्दलच्या शोधांसाठी, विशेषत: एन्झाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्टेसचा शोधासाठी नोबेल पारितोषिक जिंकले.त्यांनी इम्युनोलॉजी,व्हायरोलॉजी,कॅन्स र रिसर्च,बायोटेक्नॉलॉजी आणि रिकॉम्बिनंट डीएनए संशोधनात योगदान दिले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी उपक्रमाचे कौतुक केले तसेच विद्यार्थ्यांमधील बदल अनुभवता येत आहेत असे सांगितले आणि पुढील वाटचालीसाठी शभेच्छा दिल्या.याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे व प्रा.श्रीनिवास कुलकर्णी आणि विद्यार्थी मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्या-र्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

संपादकीय

ओडिशात युती'?

लोकसभा निवडणुकीत ३७० जागा जिंकण्याबद्दल खुद्द भाजप साशंक असावा. त्यामुळेच ओडिशात युती करून काही जागा पदरात पाडून उणीव भरून काढण्याचा भाजपचा प्रयत्न दिसत आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी बिजू जनता दल आणि भारतीय जनता पक्ष एकत्र येऊ शकतील का? गेल्या महिनाभरात तसे संकेत मिळत आहेत. अन्य पक्षांच्या दिवंगत अथवा हयात असलेल्या नेत्यांची भाजपचे नेते क्वचितच प्रशंसा करतात. कधी केलीच तर त्यासाठी काही कारण जरूर असते. बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांना भारत रत्न' जाहीर करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्या नंतर लगेचच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार विरोधी आघाडीतून भाजपच्या आश्रयाला आले. दोन दिवसांपूर्वी ओडिशामधील चंडीखोल येथे मोदी यांनी केंद्राच्या विविध योजनांचे उद्घाटन आणि लोकार्पण वगैरे कार्यक्रम केले. तेथे पोहोचण्यापूर्वी मोदी यांनी एक्स'वर (पूर्वीचे ट्वीटर) ओडिशाचे माजी मुख्यमंत्री बिजु पटनाईक यांच्या जयंती निमित्त त्यांच्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव केला. नंतर जाहीर कार्यक्रमात बोलताना त्यांनी विद्यमान मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांचा लोकप्रिय मुख्यमंत्री' असा उल्लेख केला. स्तुती स्पर्धेत' नवीनही मागे नव्हते. भारताचे रूपांतर आर्थिक शक्तीत' केल्याबद्दल नवीन यांनी मोदी यांची प्रशंसा केली. या ताज्या घटनेमुळे भाजप व बिजु जनता दल यांची हात मिळवणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मित्र की शत्रू?

वरवर पाहता बिजु जनता दल भाजपच्या विरोधात असल्याचे दिसते.किमान ओडिशा मध्ये तरी. कारण नवीन पटनाईक ओडिशाला स्वत:चे राज्य मानतात. तेथे त्यांना केंद्राची लुडबुड खपत नाही. जनता दलातून बाहेर पडून नवीन यांनी बिजु जनता दल हा स्वत:चा पक्ष स्थापन केला. २००० मध्ये विधानसभेची निवडणूक मात्र त्यांनी भाजपच्या मदतीनेच लढवली आणि ते मुख्यमंत्री बनले. २००४ मध्ये केंद्रातील भाजपचे सरकार पराभूत झाले; पण ओडिशात हे दोघे एकत्र होते आणि नवीन पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्या नंतर दोन्ही पक्षांत वितुष्ट आले. बजरंग दलासारख्या संघटनांचा ख्रिश्चन विरोधी दंगलीतील सहभाग हे एक प्रमुख कारण होते. नवीन यांनी भाजपची साथ सोडली आणि डाव्या पक्षांच्या तिसऱ्या आघाडीत ते सामील झाले; पण २००९ च्या निवडणुकीत त्यांचा पक्ष पूर्ण बहुमतानिशी सत्तेत आला. त्या नंतर नवीन यांना कोणाचीच गरज भासली नाही. त्यांच्या इच्छेनुसार ते राज्य कारभार करत आहेत. साहजिकच येथे भाजप हा त्यांचा प्रतिस्पर्धी' पक्ष आहे; पण संसदेत मात्र ते भाजपला अनुकूल भूमिका घेत असल्याचे दिसले आहे. राज्यसभेत भाजपला बहुमत नसताना विधेयक मंजूर करताना बिजु जनता दलाने भाजपला साथ दिल्याचे अनेकदा दिसले आहे. एकंदरीत ही मैत्रीपूर्ण शत्रुत्वाची व्यवस्था' दोन्ही पक्षांना उपयुक्त आहे, असे असताना अचानक मोदी व नवीन यांनी परस्परांची स्तुती करण्याचे कारण काय? हा प्रश्न उपस्थित होतो. यात जास्त गरज कोणाची कोणाला आहे हा उप प्रश्न आहे. ओडिशा विधानसभेची निवडणूक येत्या जूनमध्ये किंवा त्यापूर्वी अपेक्षित आहे. म्हणजेच लोकसभेच्या निवडणुकी बरोबरच तीही होऊ शकते. गेल्या वेळी मिळाले तसे बहुमत पुन्हा मिळेल, याची खात्री नवीन यांना नसावी. कदाचित 'इंडिया' आघाडीतील डावे पक्ष व काँग्रेस यांना राज्यात बळ मिळत असल्याची शंका त्यांना आली असेल. राज्यात विधानसभेच्या १४७ जागा तर लोकसभेच्या २१ जागा आहेत. भाजपला येत्या लोकसभा निवडणुकीत ३७० जागा मिळण्याचा दावा मोदी यांनी केला आहे; पण महाराष्ट्र आणि दक्षिणेकडील राज्यांत भाजपला विरोध वाढत आहे. पश्चिम बंगालचीही खात्री नाही म्हणून जागांची कमतरता भरून काढण्यासाठी बिजु जनता दलासारख्या प्रबळ प्रादेशिक पक्षाशी 'जुळवून' घेण्याचे भाजपने ठरवले असेल. बहुमत मिळवण्यासाठी भाजपच्या यंत्रणेचा वापर करून घेण्याचा विचार नवीन यांनी केला असेल. जर यश मिळाले तर केंद्रात भाजप व राज्यात आपण सुखनैव राज्य करू असे हे गणित असण्याची शक्यता दाट आहे. राजकारणात मित्र व शत्रू कायमचे नसतातच. तात्कालिक गरज महत्त्वाची असते.

ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.

– संपादक **यशवंत** लातूर

हिपॉक्रेटिस ४०



वैद्यकशास्त्राच्या नभांगणात चमकणारा पहिला ग्रीक तारा हिपॉक्रेटिस याचा जन्म कॉस या बेटावर इ. स. पूर्व ४६० मध्ये झाला. लहानपणापासूनच तो बुद्धिमान होता आणि गणित, ज्योतिष, राज्यशास्त्र व नाट्य वगैरे विषयात तो प्रवीण होता. तत्कालीन सुप्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञ हिरॉडिकस याच्याकडे तो वैद्यकाच्या अभ्यासासाठी गेला आणि विविध देशोदेशीच्या प्रवासातही हिपॉक्रेटिसने अनेक विद्यांचा व विविध ज्ञानाचा संग्रह केला.

त्याकाळी ग्रीस देशामध्ये देवाच्या कोपामुळे रोगराई, आजार होतात असे समजले जाई. नवस, स्वप्ने, दृष्टांत याद्वारे रोगनिवारणाचे मार्ग अवलंबले जात असत. अंधश्रद्धेमुळे रोगावरील उपाय नेमकेपणाने कोणी शोधत नसत. अशा मांत्रिक, भूतांच्या मतप्रवाहांविरुद्ध हिपॉक्रेटिस बंड करून उठला. रोगनिवारणासाठी योग्य उपचार व आरोग्य वर्धक वातावरण यांचे महत्त्व हिपॉक्रेटिसने गावकऱ्यांना, लोकांना पटवून दिले. दैवी प्रयत्नाऐवजी रोग परीक्षा, रोग निरीक्षण व औषधोपचार यांचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आणून दिले. युरोपच्या इतिहासात मानवी उपायानेच रोगनिवारणाचा मार्ग सापडतो, असे ठामपणे सांगणारा पहिला वैद्यकशास्त्रज्ञ म्हणजे हिपक्रिटिस होय.काही ग्रीक नागरिकांचा मात्र त्याला विरोध असे. देव किंवा दैवाविरुद्ध बोललेले त्यांना आवडत नसे. अशाने देवाचा कोप होऊन साथी फैलावतील असे त्यांना बाटे पण या जनसामान्यांच्या विरोधाला हिपॉक्रेटिसने न जुमानता कर्तव्य चालू ठेवून वैद्यकीय ज्ञानास शास्त्रीय स्वरूप दिले. त्या काळच्या वैद्यांपेक्षा हिपक्रिटिसला शरीरशास्त्राचे बरेच ज्ञान होते. शरीरातील हाडे, प्रत्येक हाडाचे स्थान व परस्पर संबंध याचे थोडेफार ज्ञान त्याला होते. रोगी कसे तपासावेत, रोगपरीक्षा कशी व्हावी, वैद्याचे वर्तन कसे असावे याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन हिपॉक्रेटिसने करून ठेवले आहे.

रोग्याशी कसे वागावे, स्वच्छता कशी राखावी, हत्यारे कशी वापरावीत, रोग्याचा बिछाना कसा असावा, जखमा कशा बांधाव्यात याविषयीची सविस्तर माहिती त्याने लिहून ठेवली आहे. वैद्यक म्हणजे डॉक्टरकी करताना डॉक्टरांना जी प्रतिज्ञा घ्यावी लागते तिची मूळ बैठक हिपॉक्रेटिसनेच तयार करून ठेवली आहे. डॉक्टरांच्या आचारसंहितेवर त्याने स्वच्छ प्रकाश टाकला आहे. डॉक्टरांच्या हातात जिव्हाळा असेल तर त्याने रुग्ण अर्धा बरा होईल आणि अर्धा अचूक औषधाने बरा होईल. 'मी माझ्या पेशाशी व रुग्णाशी एकनिष्ठ राहीन.' अशी शपथ घेऊन डॉक्टरांनी या पेशात प्रवेश करावा असे त्यांचे सांगणे होते.

हिपॉक्रेटिस नीतीशास्त्राचाही भोक्ता होता. डॉक्टरांनी नीतिमान असावे हे सांगताना तो म्हणतो रोग्याच्या खोलीत प्रसन्न चित्ताने प्रवेश करावा, रोग्यांस संबंधितास दिलासा वाटेल असे बोलावे, पोशाख नीटनेटका, सौम्य असावा, पैशासाठी रोग्यास न अडविता उपचार करावेत, आधी माणसावर प्रेम करा मग धंद्यावर ! आपल्या व्यवसायाची कला ज्या माणसांसाठी आहे. त्यावर प्रेम करण्याने ती समृद्धच होईल अशी लाखमोलाची शिकवण देऊन व रुग्णसेवेत आयुष्य वेचणाऱ्या या महान शास्त्रज्ञाचा अंत इसवी सन पूर्व ३७० मध्ये झाला.

शिक्षणातील सत्त्व हरवत आहे काय?

विद्येचे माहेर समजल्या जाणाऱ्या महानगरात कोट्यवधी किंमतीच्या ड्रगची जप्ती केली असल्याचे वृत्त प्रकाशित झाले. त्याचवेळी दोन मुली एका परिसरात नशेत असल्याच्या अवस्थेत सापडल्याचे छायाचित्र व ध्वनीचित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाली. आपली तरूणाई कोणत्या दिशेने जात आहे हे वर्तमानातील चित्र अत्यंत धक्कादायक आहे. जेव्हा शिकलेली माणसे नशेच्या आहारी जात आहेत तेव्हा आपले भविष्य किती भयंकर असणार आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

कधी काळी तरूण नशा करत होते; पण आता तर तरूणीदेखील या नशेच्या खाईत लोटल्या जात आहेत. हे अत्यंत विदारक चित्र आहे. अशा वेळी शिक्षणातून नेमका विवेकी विचार प्रसुत करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपण काय करत आहोत याची जाणीवदेखील विद्यार्थ्यांना होत नाही, हे अधिक दुर्दैवी आहे. आपण आपला विवेक गमावला असल्याचे चित्र या निमित्ताने समोर आले आहे. शिक्षणाचा प्रसार करण्याचा विचार एकीकडे उंचावण्यासाठीचा प्रयत्न होत आहे. देशातील सुमारे सव्वीस टक्के तरूणाई उच्च शिक्षणात सहभागी आहे. तरूणाई म्हणजे आपले भविष्य आहे, अशावेळी हीच तरूणाई अधिकाधिक व्यसनाधीन होत आहे, हे चिंताजनक आहे.

आपले राज्य संत परंपरेचे राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याने देशाला शाहू, फुले, आंबेडकर, टिळक, आगरकर, रानडे यांसारखे परिवर्तनाची वाट दाखविणारे विचारवंत दिले. आज त्या राज्यातील तरूणाई नशेच्या आहारी जाताना दिसत आहे. राज्यकर्ते राज्यात अधिक बिअर विकली जावी म्हणून अभ्यास समिती नेमत आहे. ती किराणा दुकानात विकली जावी म्हणून प्रयत्नांची परीभाषा केली जात आहे. आजही महानगरे, नगरे देखील विचारात घेतली तर त्या ठिकाणी असलेल्या मद्याच्या दुकानात तरूणाईचीच गर्दी अधिक दिसते. शहरातील बिअर बारमध्ये तरूणाचा भरणा वाढतो. शिकलेली मुले व्यसनांच्या आहारी जात आहेत. मुले जेव्हा व्यसनात स्वतःला गुंतून ठेवतात तेव्हा त्या देशाला कोणतेच भविष्य नसते. आज आपण ज्या वाटेने जात आहोत ती वाट आपले भविष्य अंधारमय करत आहे याची जाणीव देखील त्या तरूणाईच्या मनात नसावी, ही गोष्ट चिंताजनक आहे. महाविद्यालयाच्या दारात येणारी आजची तरूणाई ही मद्यालयाच्या दारातून येत आहे का? असा सवाल पडावा असे आपले वर्तमान आहे.

महाविद्यालय नुकतेच सुरू झाले होते. महाविद्यालयाचा परिसर उंचउंच इमारती आणि निसर्गाने नटलेले होता. हा परिसर सर्वांना मोहीत करत होता. विविध विभागाच्या उंच उंच इमारती सर्वांना खुणावत होत्या. नवी स्वप्ने घेऊन विद्यार्थी पालकांच्या सोबत महाविद्यालयात प्रवेशासाठी गर्दी करत होते. विद्यार्थ्यांचा शालेय शिक्षणाचा प्रवास थांबला होता. महाविद्यालयात प्रवेश घेताना अनेकांच्या मनात आनंदाचे भरते आले होते. महाविद्यालयात प्रवेश घेतला, की मुले बिघडतात असे जणू समीकरण झाले आहे. महाविद्यालयात मुले प्रवेशित करताना मुले शिकली नाही तरी चालतील; पण बिघडता कामा नये ही चिंता त्यांना अधिक

सतावत आहे. मुले शिक्षणात घडत नाही असाच अनुभव आपल्या भोवतालमध्ये दिसत आहे. काही महाविद्यालये वेगळी असल्याचा आपला ठसा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अर्थात तेही किती प्रमाणात त्यात यशस्वी होतात हा देखील प्रश्न आहे; पण किमान दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने पालक त्याकडे पाहत असतात. प्राचार्यांसोबत बोलत असताना ते सांगत होते, तुमची महाविद्यालयातील शिस्त आणि तेथे संस्काराचे धडे गिरवण्याचा प्रयत्न होत असल्याने मुली प्रवेश घेत आहेत. एक प्रकारे सामाजिक घटना घडामोडीची अनामिक भिती सांगणाऱ्या पालकांच्या मनात होती. भेटलेल्या प्रत्येकाला विश्वास देण्याचा प्रयत्न प्राचार्य करत होते. मुलेही मोठ्या अपेक्षेने महाविद्यालयातच येत होती. गुणवत्ता असलेल्या अनेक मुलीही महाविद्यालयात प्रवेश घेत होत्या. अनेकांना उच्च गुणांची स्वप्ने होती. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे मैदान खुणावत होते. काहींना समृद्ध ग्रंथालय, अनेकांची अनेक स्वप्न होती आणि परिपूर्तीसाठी महाविद्यालय एकमेव माध्यम होते. हे सारे महानगरातील भव्यदिव्य पाहिले, की आपण भारतात नाही, तर इंडियात आहोत याची जाणीव होत राहते. ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात शहरांबद्दलचे आकर्षण असतेच. शहरातील वातावरणाबद्दल माध्यमातून अनेक गोष्टी छापून येत असतात. आलेल्या वृत्ताच्या आधारे मनात निर्माण केलेल्या प्रतिमा मनात जपल्या जात होत्या. त्यादृष्टीने अवतीभोवती नजर असते. त्यामुळे मुलांच्या मनात असलेले आकर्षण, अनामिक भितीबद्दल मुलांना वास्तवाचे दर्शन घडवायला हवे. मुलांच्या मनात खोट्या समजुती घर करत असतात. त्या गैरसमजुतीचा वृक्ष होण्यास किती बर वेळ लागेल? त्या गैरसमजुतीपासून परावृत्त होण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मुलांशी खरेतर संवाद साधण्याची गरज निर्माण झाली आहे. महाविद्यालयात गेल्यावर कधीकाळी तरूणाईला मोठमोठी स्वप्न पडत होती. पूर्वी महाविद्यालयात प्रत्येकाशी आंतरिक संवाद असायचा, आता ते बंध हळूहळू सैल होत चालले आहे. आदराने हे सर्व घडत होते. आता आदराचा भाव गमावणे घडत आहे. याला केवळ विद्यार्थी जबाबदार आहे असे कसे म्हणता येईल? शिक्षण विकले जात आहे. महाविद्यालये म्हणजे आता दुकानदारी ठरू लागली आहे. विद्यार्थी शिक्षणासाठी पैसा ओतत आहेत आणि शिक्षक, संस्थाचालक ते विकत आहेत. त्यामुळे नात्यातील ओलावा हरवला आहे. यामुळे दुकानदारीतून संस्काराची वाताहात होणार यात शंका नाही. शेवटी नफाच मिळवायचा आहे तर मग तेथे संस्कार कसे मिळणार? नफ्यासाठी हवे ते करण्याची मानसिकता निर्माण होत आहे. त्यातून शिक्षणाचे सत्व हरवत चालले असल्याच्या अनेक घटना आपल्या भोवतालमध्ये होताना दिसतात. विद्यार्थ्यांसोबत वरवरचा संवाद करण्याऐवजी आंतरिक संवाद व्हायला हवा. केवळ माहितीच्या आणि कायद्याच्या तुकड्यांनी मांडणी करून फार काही साध्य होणार नाही. महाविद्यालयाची शिस्त राखली जावी म्हणून विद्यापीठाचे कायदे, शासनाचे कायदे सांगून विद्यार्थ्यांच्या भावनाचे दमन होईल; पण मुळात वाईट वागू नये यासाठीचा विवेक विचाराच्या पेरणीचे नेमके काय करायचे याचा विचार करण्याची गरज आहे. त्या दिवशी महाविद्यालयात सहजतेने फिरत असताना त्या तरूणाईचा विचार मनात घर करत होता. अवतीभोवतीच्या वातावरणाबद्दल मुलांच्या मनात असलेले विचार. माता-पित्यांच्या अपेक्षा आणि त्याचवेळी त्यांच्या मनात असलेल्या चिंता हे सारे डोळ्यासमोर उभे राहत होते. अलीकडे घरातील संवाद हरवला आहे.अलिकडच्या काळात मुला-मुलींना चित्रपटाचे मोठे आकर्षण आहे. मोबाईलवर ते सतत काहींना काही पाहत असतात. त्यामुळे त्या दिशेने संवाद महत्त्वाचा होता. दरम्यान विद्यार्थी उभे असलेल्या एका घोळक्यापासून जात असतांना एका चित्रपटावर त्यांची चर्चा सुरू होती. या चित्रपटाचा ट्रेलर मोठा भारी होता. शहरातील एक श्रीमंत बाप आपल्या लेकीवर लक्ष ठेवण्यासाठी सुरक्षारक्षकाची नियुक्ती करतो. असे काही सूत्र घेऊन तो चित्रपट पुढे जात राहतो. बापाची चिंता काय असते हे दाखविण्याचा प्रयत्न त्यातून करण्यात आला होता. ही कथा नाही. ही कथा केवळ पुस्तक आणि चित्रपट देखील मर्यादित राहिलेली नाही. आता या घटनांनी आपला भोवताल व्यापून टाकला आहे. आपल्या मुलीसाठी सुरक्षा रक्षक ठेवण्याची वेळ एखाद्या बापावर यावी याचे कारण काय असू शकते? एखाद्या मुलीसोबत असा एखादा सुरक्षारक्षक पाठविण्याची वेळ पालकांवर येते याचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे.

खरेतर आपण जेव्हा बाह्य संवाद करत असतो त्यापेक्षा आत्मसंवाद करणे चांगले असते. या निमित्ताने स्वतःत डोकावून काही ठरविणे, परिणामकारक असते. त्यातून मग उत्तरांचा शोध सुरू होतो. यातून अनेक उत्तरांची माला सुरू होते. संवादात उत्तरांचा पाऊस पडू लागतो. कोणी महाविद्यालयातील वातावरण, सांस्कृतिक पार्श्वभूमी, आई वडिलांचे संस्कार, महानगराऐवजी छोट्याशा शहरातील शिकणे अशी विविध उत्तरे आपल्याला मिळत जातात. या उत्तरांपेक्षाही महत्वाचे वाटत होते ते प्रत्येकाच्या मनात दडलेला सुरक्षारक्षक. हा सुरक्षा रक्षक म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून प्रत्येकाच्या अंत:करणात असलेला सुरक्षा रक्षक म्हणजे स्वतःच्या स्थायी असलेला विवेक. प्रत्येकाने आपल्यातील विवेक जागृत ठेवणे महत्वाचे आहे. विवेक हाच आपला सुरक्षारक्षक असतो. तो सजग राहिला तर जीवन प्रवासात कितीही मोठ्या वादळात स्थिरपणे उभे राहणे घडू शकते. आपल्या मनातील विवेकाचा सुरक्षारक्षक सतत सोबत करेल. मोठ्या विश्वासाने आई वडिलांनी मुलांना महाविद्यालयात पाठविलेले असते. त्यांनी टाकलेला विश्वास सार्थ करणे प्रत्येकाचे कर्तव्य नाही का?

शिक्षणातून व्यक्तीचा बाह्यांगांने विकास करणे अपेक्षित असेलही; पण आंतरिक विकास तर अधिक महत्त्वाचा आहे. लिहिणे, वाचणे आणि गणन करता येणे ही साक्षरता गरजेची आहेच. त्या बरोबर सामाजिक वातावरण अधिक समृद्ध करण्याची देखील गरज आहे. शिक्षणातून मुलांमध्ये सदसदविवेक बुद्धी विकसित करण्याची गरज आहे. जीवनांच्या प्रवाहात जेव्हा जेव्हा होडी डळमळते तेव्हा विवेकांच्या पातळीवर घेतलेल्या निर्णयामुळे ती अधिक स्थिर होते. कितीही संकट आली तरी पराभूत न होता सामोरे जाण्याची शक्ती मिळते. ती शक्तीच शिक्षणातून विकसित करण्याचे मोठे आव्हान शिक्षणासमोर आहे. ते विकसित होऊ शकले तर मनात असलेल्या आंतरिक भितीला कायमचा रामराम करता येईल. समाजात वाईट घटना घडण्याची शक्यता मावळेल. संवेदनशीलता वृध्दीगंत होईल. शिक्षणातील विविध विषयांच्या माध्यमातून विवेकाची जागृती करण्याचे आव्हान पेलण्याची गरज आहे. पालकांनी देखील मुलांना काही समजत नाही. त्यांना काही कळत नाही असे न मानता, त्यांना देखील चर्चेला संधी उपलब्ध करून देण्याची गरज लक्षात घ्यायला हवी.

कोणताही निर्णय घेताना विश्वासात घेण्याची गरज आहे. संवाद वाढवायला हवा. एखादा निर्णय का घेत आहोत या मागील पार्श्वभूमी संवादातून एकमेकापर्यंत पोहचवता आली तर मुलांची पावले कधी आडवाटेने जाण्याची शक्यता नाही. त्यामुळे विवेकासाठीचा संवाद सुरू तर करायला हवा. विवेक हरवला, की आपल्यासमोर प्रश्नांची मालिका निर्माण होणार यात शंका नाही. आज शिक्षणातून एकवेळ बौद्धिक विकासाची प्रक्रिया कमी प्रमाणात झाली तरी चालेल; पण विवेकाची पेरणी आणि त्या दृष्टीचा विचार मात्र अधिक वृद्धीगंत करण्यासाठी पावले टाकण्याची गरज पुन्हा पुन्हा अधोरेखित होऊ लागली आहे. तो प्रवास करू शकलो नाही तर उद्याच्या भविष्याची आज जी नांदी वाजत आहे ती नांदी आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या भविष्याची वाट अधिक कठीण करून जाईल. आपल्याला नेमके कसे भविष्य हवे आहे याचा विचार करायला हवा. आज राज्यकर्ते, धोरणकर्ते सत्तेत मशगुल असले तरी उद्या ही सत्ता भोगण्यासाठी लागणार समाज जर चांगला नसेल तर ती माणसे सत्तादेखील उपभोगू देणार नाहीत. आज समाजात विचाराची मोठी पोकळी निर्माण होताना दिसत आहे. अशा वेळीच तोच इशारा समजून पावले टाकायला हवी.–ऐसपैस शिक्षण : संदीप वाकचौरे

राशी भविष्य

राशीभविष्य
०८ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल.

वृषभ : शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका.

मिथुन : शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील.

कर्क : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

सिंह : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर
मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

कन्या : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

तुळ : शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर
एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

वृश्चिक : शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पूर्व
धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

धनु : शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम
कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

मकर : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

कुंभ : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : दक्षिण
इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

मीन : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल.

०७ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर नेपच्यूनचा जास्तीत तास्त प्रभाव आहे. जीवनात जे काही गूढ अनाकलनीय आहे त्याबद्दल तुम्हाला मनस्वी आकर्षण वाटते बऱ्याच घटनांची तुम्हाला पूर्वसूचना मिळते. स्वप्नात काही भविष्यकालीन घटना दिसतात वा दृष्टांत होतात. स्वप्नातून बऱ्याच वेळा परलोकातील आत्म्यांशी संपर्क साधण्याचेही अनुभव येतात. तुमच्याकडे असामान्य प्रतिभा आहे तिचा उपयोग तुम्ही कलानिर्मितीसाठी करून घेता. तुमची वृत्ती स्वप्नाळू आहे. भविष्याची स्वप्ने रंगवायाला तुम्हाला आवडते. या जगातल्या भावनिक समस्यांवर तुम्ही उपाय शोधता. नैराश्याला पगडा तुमच्या मनावर चटकन बसू शकतो. मग तुम्ही स्वत:च्या कोशात स्वत:ला गुरफटून घेता. त्यापेक्षा अशा वेळी निसर्गाच्या सहवासात, जलाशयाकाठी जा. तेथून तुम्हाला नक्की स्फूर्ती लाभेल. मनोविकारांची तुम्ही चटकन शिकार होऊ शकता. नैराश्य, आत्मघातकी वृत्ती टाळण्यासाठी मादक द्रव्यांचा वापर करू नका. लोकात मिसळा.

कार्यक्षेत्र : तुमच्या संवेदनशील स्वभावामुळे लोकांच्या भावनिक समस्या, गुंतागंत सोडवण्याची जी क्षेत्रे आहेत तेथे तुम्ही भरीव कार्य करू शकाल. मनोविषण, मानसचिकित्सा, मानसोपचार, मनोविकार तज्ज्ञ या क्षेत्रात तुमचा प्रवेश व उत्कर्ष लवकर होईल. वैवाहिक सल्लागार, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, कुटुंबकल्याण, समाजकल्याण सल्लागार यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक मानसशास्त्रातील पदविका प्राप्त करा. पर्यटन, पाणी पुरवठा, शीतपेये या उद्योगातही प्रगती करू शकाल.

प्रणयी जीवन : तुमचा स्वभाव अत्यंत हळवा असल्याने कुणाचा तरी भक्कम आधार तुम्हाला लागतो. आपले विचार, भावना, मनोगत जोडीदाराने सखोलपणे समजून घ्यावे अशी तुमची अपेक्षा असते. अति महत्वाकांक्षी, आडदांड माणसे तुम्हाला आवडत नाहीत. या दृष्टीने ऑक्टोबर २३ ते नोव्हेंबर २२ मधील व्यक्ती टाळा. ऑगस्ट २२ ते सप्टेंबर २२ मधील २, ११, २०, २९ तारखेच्या व्यक्तींना प्राधान्य द्या.

वर्षफळ : वर्षभरात समाजकारणी, उद्योगपतींशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित होतील. व्यवसायात कर्तबगारी गाजवण्याच्या संधी येतील. अनेक नवे करार पदरात पाडून घ्याल. फेब्रुवारी मार्च मध्ये आर्थिक प्राप्ती उंचावेल. एप्रिल मे मध्ये मित्रांचे गैरसमज दूर करण्यात वेळ जाईल. जून जुलै मध्ये प्रीती फुलेल. मनोमीलन, जवळीक साधेल. ऑगस्ट मध्ये विरोधकांवर वचक बसवाल. डावपेच यशस्वी होतील. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये राजकीय, सामाजीक क्षेत्रात प्रतिमा उजळ होईल.

महत्वाचे वर्ष : ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७०, ७९ .
भाग्यरत्न : लसण्या
याच तारेखेची व्यक्ती :

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

महिलांचे आर्थिक स्वावलंबन हाच राष्ट्रीय विकासाचा महामार्ग

गावाकडे जाण्याचा संदेश महात्मा गांधींनी अनेक वर्षांपूर्वी दिला. कारण भारत हा मूळ खेड्यात असलेला देश असून खेड्याचा विकास हा खऱ्या अर्थाने भारताचा विकास आहे, खरं म्हणजे खेड्याचा विकास झाला तरच आधुनिक भारत विकासाच्या खऱ्या पायऱ्या पार करेल. जशी एक शिक्षित आई पूर्ण घरचा विकास करू शकते तसेच खेड्या खेड्यांमधून होणारा महिलांचा विकास हा खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

आजच्या काळात खेड्यातील किंवा शहरातील महिलांचा विकास सर्वतोपरी होणे अत्यावश्यक आहे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे. सामाजिक, राजकीय ,वैद्यकीय, संशोधन ,शैक्षणिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्षेत्र असो ती या क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवीत आहे .ग्रामीण भागातील महिला आजच्या घडीला शहरी भागातील महिलांच्या बरोबरीने किंबहुना त्यापेक्षा जास्त हिरेरीने काम करताना दिसत आहे. या महिला आपल्या आर्थिक विवेचनेचा प्रश्न सोडवताना अनेक आर्थिक समस्येच्या प्रश्नावर मात करून एक वेगळा दृष्टांत समाजासमोर ठेवला आहे .ग्रामीण महिला आर्थिक सक्षमही करण्याचे धडे घेऊन स्वतःला सक्षम बनवण्याची ध्येय समोर ठेवून आधुनिक शेतीच्या माध्यमातून, लघु उद्योगाच्या माध्यमातून स्वतःची प्रतिमा निर्माण करताना दिसत आहेत .चूल आणि मूल तत्त्वाला बाजूला सारून ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणाकडे वळत आहेत .शेती ,शिक्षण, वैद्यकीय, बचत गट, राजकारण अशा अनेक क्षेत्रात महिलांची वाटचाल साक्ष देताना दिसते. ग्रामीण भागातील महिला या लघु उद्योगाच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाच्या एकेक टप्पा पार करत आहेत. ग्रामीण महिला शेतीच्या कार्याबरोबरच शेतीविषयक कामाचा कार्यभार उत्तम पद्धतीने करतात जसे शेतीतील मजुरांचा हिशोब ,मजुरी, आठवड्याचा बाजार ,शेतीच्या कामाचा ताळेबंद, हिशोब या कामाबरोबरच मुलांच्या शैक्षणिक गरजा ,घरातील आर्थिक कामकाजाचा हिशोब ,ही जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडते. ग्रामीण भागातील महिलांच्या विकासासाठी त्यांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक योजना राबवल्या आहेत त्यातील एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे महिला बचत गट या योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांना माफक तरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. ज्यामुळे ग्रामीण महिला शशक्त व आत्मनिर्भर बनवले जाते .बचत गटाच्या माध्यमातून महिला आपल्या सोयीनुसार लघुउद्योग सुरू करून आपला आर्थिक विकास साध्य करतात आणि या योजना ग्रामीण महिलांना सक्षम बनवते .महिला बचत गट कर्ज योजना ही वरदानच ठरली आहे. या योजनेच्या माध्यमातून लघुउद्योग सुरू करून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करू शकतील जेणेकरून नोकरीच्या शोधात असणाऱ्या महिलांना रोजगार मिळेल बेरोजगार महिलांना स्वतःच्या घरापासून दूर शहरात जाण्याची गरज पडणार नाही. परिणामी नागरिकांचे एका राज्यातून दुसऱ्या चर्चात होणारे स्थलांतर थांबेल. महिला बचत गट योजनेच्या माध्यमातून इच्छुक महिला स्वतःचा उद्योग सुरू करून सामाजिक दृष्ट्या सुद्धा ती सक्षम बनेल तसेच अशा महिलांना पैशासाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही. त्या स्वतः स्वावलंबी बनतील जेणेकरून त्यांचा आत्मविश्वास वाढेल म्हणून महिलाही सर्वांगीण दृष्ट सक्षम बनली तरच आपल्या कुटुंबाचा तसेच आपल्या मुलांच्या शिक्षणाचा चांगल्या पद्धतीने निर्वाह करेल . हे खऱ्या अर्थाने महिलांच्या एकूणच सामाजिक उत्थानामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण आणि जबाबदारीने वापरली जाणारी संकल्पना. परंतु अलीकडच्या काही वर्षांपूर्वीपर्यंत महिलांना खऱ्या अर्थाने सर्वच बाबतीत स्वावलंबन प्राप्त झालेआहे असे म्हणता येत नव्हतं. आजही काही बाबतीत हे लागू पडतं. मात्र अलीकडे सर्वच सामाजिक प्रवर्गात सुरू असलेली एक चळवळ जिला आपण बचत गट म्हणतो त्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला सुद्धा आर्थिक दृष्टिकोनातून स्वावलंबी बनत असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे.

वास्तविक बचत ही महिलांची मूळ प्रवर्ति, मात्र ही बचत कधी पदराच्या गाठीच्या स्वरूपात, तर कधी डाळी डुळी, उतरंडीच्या कुठल्यातरी अन्नधान्याच्या कप्प्यात पडलेली असायची. ती घरच्याच अडचणीच्या वेळी बाहेर निघायची. मात्र अशा बचतीचा कुटुंबाला आधार नेहमीच होत आला आहे. अशा बचतीला बँकांच्या माध्यमातून वृद्धिंगत करण्याचा विचार जागतिक पातळीवर सुरू होऊन तो सर्वप्रथम बांगलादेशात डॉ. मोहम्मद युनूस या नोबेल पुरस्कार विजेत्यांनी रुजवला. त्यानंतर हा विचार भारतातील महिलांच्या बाबतीत बरोबर उपयोगात आणता येऊ शकतो या विचाराने १९९१ पासून भारतात सुद्धा बचत गट चळवळीला प्रारंभ झाला. भारताच्या ग्रामीण भागाचं आर्थिक चित्र हे सावकारी पाशातून पुढे जातं साकारत. त्यामुळे सावकाराच्या जोखडातून कुटुंबाची सोडवणूक करायची असेल तर महिलांना आर्थिक उत्पन्नाच्या साधनांची जोड देऊन आर्थिक सक्षम केलं पाहिजे हा विचार पुढे आला आणि त्यातूनच भारताच्या वेगवेगळ्या राज्यात महिला बचत गटांची एक स्वतंत्र चळवळ उभी राहिली. त्यातून आर्थिक समृद्धीची वाटचाल सुरू झाल्याचे आपल्याला पाहायला मिळतं. आज देशातल्या अनेक प्रदेशातील बचत गटांनी आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत ख्याती मिळवली आहे. महाराष्ट्रातले बचत गट देखील त्यात मागे नाहीत. बचत गट म्हणजेच आर्थिक स्वावलंबन, आर्थिक साक्षरता, आर्थिक आत्मनिर्भरता ,उद्योजकता आणि आपल्यातील सुप्त गुणांना वाव ,संधी देत आपण आपल्यासह समाज आणि देशाच्या उन्नती मध्ये, देशाच्या एकंदरीत उत्पन्न वाढीमध्ये ,दरडोई उत्पन्नात भर टाकत बचत गट दैदीप्यमान कार्य करत आहेत. यातल्या काही बचत गटाची उदाहरणे तर खूपच महत्त्वपूर्ण योगदान देणारी आहेत. महाराष्ट्रातल्याच कोल्हापूर जिल्ह्यातल्या शाहूवाडीतील मानकर वाडीतल्या केवळ ४०० लोकसंख्या असणाऱ्या गावाने बचतगटांच्या माध्यमातून संपूर्ण कायापालट करून दाखवला, तर अक्कलकोट तालुक्यातल्या जीवन ज्योती महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या सॅनिटरी नॅपकिन्स उत्पादित करून त्यांचं वितरण व उत्पादन संपूर्ण राज्यभर नव्हे तर आता देशातल्या अनेक प्रदेशात सुरू केलेला आहे. त्यात हिमाचल प्रदेश, कर्नाटक, सिक्कीम, छत्तीसगड, बिहार सारख्या राज्यात या महिला बचत गटांनी आपली उत्पादन केंद्रे सुरू केली आहेत. खानदेशातील महिला बचत गटांनी तर मक्याच्या पिठापासून सुंदर कलाकृती तयार करणे आणि साता समुद्रा पार भारतमाता अर्थात गोधडी बचत गटाच्या माध्यमातूनच पोहोचवली आहे. शिवाय लातूर सारख्या शहरात सुद्धा महिला बचत गटाच्या माध्यमातून अतिशय निम्न स्वरूपाचं कार्य असणाऱ्या सेफ्टी टँक स्वच्छता करण्यासाठी यांत्रिक उपकरण उपलब्ध करून दिली आहेत. म्हणजेच नेहमी कुरडया- पापड्या - मसाले यासारख्या पारंपारिक वस्तूच्या उत्पादनात अडकलेली महिला आता बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रात आपला नावलौकिक कमावत आहेत. या बचत गटाच्या माध्यमातून महिला खरोखरच सक्षम होत आहेत का? आर्थिक स्वावलंबी होत आहेत का? याबाबतीत निकिता नावरिया आणि डॉ. प्रीती रॉय यांनी संशोधन केला आहे. त्यातून महिला बचत गटामध्ये सर्वाधिक सक्रिय असणाऱ्या महिलांचा वयोगट हा ३० ते ४० मधील आहे. यावरून आपण युवती वैवाहिक जीवनात प्रवेश करून वैवाहिक जीवनात येणाऱ्या अडचणींचा सामना करताना बचत गटाच्या माध्यमातून जोडली जाते हे सिद्ध होते. त्यामुळे गृहिणी, नवउद्योजक आणि रोजगार करणारी महिला सुद्धा बचत गटाच्या माध्यमातून जोडली जाते, हे महिलांच्या होणाऱ्या आर्थिक सक्षमीकरणासोबत स्वावलंबनाच्या बाबतीत देखील उल्लेखनीय कार्य म्हणावे लागेल. वास्तविक पाहता महिला बचत गटांना आर्थिक ताकद पाठबळ देण्याचे काम केंद्र आणि राज्य सरकारांच्या माध्यमातून होत आहे. बचत गटांना त्यांनी बचत केलेल्या रकमेपेक्षाही कितीतरी पटीने अधिक आर्थिक मदत शासनाच्या माध्यमातून, बँकांच्या मध्यस्थीतून उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे महिलांचा सहभाग आणि महिलांची परस्पर विश्वासार्हता अधिक दृढ होत आहे. काही महिलांनी तर डॉ. प्रीती राय यांना दिलेल्या उत्तरात बचत गटाने आमच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे मान्य केले आहे. म्हणजेच बचत गट ही केवळ शिकून सवरून पदवी ग्रहण केलेली महिला ही जशी आर्थिक सक्षम नसते तसं बचत गट सुरू करून आर्थिक स्वावलंबन प्राप्त होत नाही तर त्यासाठी महिलांनी महिलांवर ठेवलेल्या विश्वासाच्या बळावर आणि दिलेल्या हरत-हेचे योगदानामुळं बचत गटांना यश प्राप्त होत आहे. शिवाय करोडो रुपयांची उलाढाल शासकीय माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या प्रदर्शने, शिबिरे, विक्रीचे स्टॉल या माध्यमातून होतेय. यातून महिला आर्थिक स्वावलंबी बनत असल्याचे आशादायी चित्र आपल्याला पहायला मिळत आहे. आता ग्रामीण महिला सुद्धा घरातील आर्थिक व्यवहारात पुरुषांच्याही पुढे जाऊन आपले विचार मांडत असल्याचं चित्र ग्रामीण भागातून पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागातल्या महिलांचे शिक्षण जरी कमी असले तरी त्या बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक साक्षर निश्चित बनल्या आहेत अस आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने निश्चितपणे सांगू शकतो.



डॉ वनिता आग्रे पटवारी
लातूर

स्वाभिमान

आज ८ मार्च जागतिक महिला दिन,यानिमित्त सर्व माझ्या मैत्रिणींना जागतिक महिला दिनाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा.८ मार्च २०२४ ते ८ मार्च २०२५ या कालावधीसाठी आपण विशेष असा काही संकल्प करावा असे मला मनापासून वाटते. संकल्प नेहमी पूर्णत्वास जातीलच याची खात्री जरी आपणास देता येत नसली तरी संकल्प करण्याची आपली प्रवृत्ती जरी तयार होत असेल तरीही त्याचा फायदा आपल्याला होतो.वारंवार संकल्पपूर्ती करण्यात आपण असफल होत असू तर आत्मग्लानी उत्पन्न होऊन,संकल्प पूर्तीस प्रेरणा मिळते म्हणून संकल्प न करण्यापेक्षा करणे अधिक चांगले असे मला वाटते.

काय करावा संकल्प?

मी महिला आहे, याचा प्रथम अभिमान बाळगूया,माझ्या भोवती असणाऱ्या माझ्या कुटुंबाचा पाया मीच असते;तो कधीही ढासळणार नाही याची सजगता कायम राखुया.शब्दांमधून नाही तर कृतीतून संस्काराची शिदोरी मुलांना देऊया आणि विशेष महत्त्वाचे म्हणजे नित्य नियमित स्वतःचीदेखील नखशिखांत काळजी घेऊया म्हणजेच शरीर- मनाची विशेष दखल घेऊया.

अध्यात्मिक शक्ती

जितकी अधिक वाढीस लागेल तितकेच आपले सामर्थ्य आणि सद्सद विवेकबुद्धी सक्षम होते, म्हणजेच कुणाला त्रास देण्याची प्रवृत्ती राहत नाही आणि कुणी त्रास दिला तरीही त्याची सल मनात राहत नाही. अध्यात्मिक शक्ती बद्दल बोलण्याचे कारण म्हणजे आज महाशिवरात्रीही आहे बाबा भोलेनाथाच्या सेवेचा विशेष दिवस,साक्षात ब्रह्मचैतन्याचा विशेष दिवस(ब्रह्मचैतन्य हे सर्वत्र,सर्वकाळ,सदैव व्यापून असलेले चैतन्य आहे.ते एका दिवसापूरते कधीही मर्यादित नाही,परंतु त्याच्या प्रचंड ऊर्जेचा केंद्रबिंदू असलेला दिवस म्हणजे आजचा दिवस होय.) ादिशक्ती,आदियोगी शिवाचा दिवस,संपूर्ण वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर येणारी ही आजची रात्र म्हणजे महाशिवरात्रीची रात्र होय, जी आपल्या अध्यात्मिक साधनेतून आपल्याला जीवन जगण्याची प्रचंड शक्ती आणि ऊर्जा प्रदान करते. ब्रम्हांडात व्यापून राहिलेल्या चैतन्याशी आपल्या आत्मचैतन्याचा संवाद साधण्याचा दिवस,आज शिवाराधना करून आपण याचा अवश्य अनुभव घ्याल. परवाच जिल्हास्तरावर, लातुर जिल्हा ग्रंथालय समितीमार्फत ग्रंथोत्सव घेण्यात आला, ज्यात कवीसंमेलनही ठेवण्यात आले होते.सदर काय किंवा अन्य कोणत्याही कवी संमेलनास श्रोतृवर्ग गैरहजर का असतो? हा विषय प्रत्येक कवींनी आत्मपरीक्षण करून पहावयास हवा. कवितेला इतके वाईट दिवस आले का? कवींची प्रतिभा इतकी कागदी विमानासारखी उडायला लागली का? हा आत्मचिंतनाचा विषय आहे. एकीकडे महिला दिनाच्या शुभेच्छा देताना महिला सातत्याने दीन का होत आहे? हे समजण्यापलीकडचे आहे. माझ्याच कित्येक मैत्रिणी त्यांची एक कविता वाचनासाठी, निमंत्रिताच्या यादीत आपले नाव नसतानाही मंचावर येऊन कविता वाचनासाठी विनंती करतात, तेंव्हा त्यांच्या कवितांचा दर्जा अतिशय सुमार असतो हे सांगावयास नको. कारण आपल्या कवितेची दखल घेतली गेली नाही,याचा अर्थच अजून आपली कविता समृद्ध होणे गरजेचे आहे,हे समजून न घेता मंचावर उभे राहण्यासाठी कित्येक माझ्या मैत्रिणी लाचार होताना पाहून मनात फार खंत वाटते, आणि कवितेबद्दल काळजी वाटते. कविता ही अंतरंगात उमटलेल्या भावभावनांचे स्पंदन असते, अंतरंगातल्या भावनांचे ती मंथन असते, ती उगीच यमक जुळवून तयार केलेल्या ओळी नसतात. काही माझ्या भगिनींना कविता वाचनासाठी धडपडताना पाहिलं की अध्यात्म आणि आत्म उन्नतीचा तर विषयच नको असं वाटतं. एका राज्य कवी संमेलनात माझी अनुपस्थिती असताना देखील माझ्या एका दुसऱ्या भगिनीने माझ्या नावावर, माझ्या जागेवर आपली रचना वाचून त्याचं मानपत्रही घेतलं याचा व्हिडिओ पाहून मला त्या महिलेबद्दल किव न यावी तर नवलच. मैत्रिणींनो साहित्य हा शब्द फार मोठ्या उंचीचा आहे.आपल्या बेशिस्त,बेताल वर्तनाने त्याचे बारा वाजून नका. कुठेही,कुणीही,उठ म्हणलं की उठून आपले काव्यवाचन करू नका. तुमच्या अशा वर्तनाने खऱ्या कवितेची आणि कवींची देखील घुसमट होत असते हे नेहमी ध्यानात ठेवा. पुरस्कारासाठी रक्कम मोजून पुरस्कार स्वीकारू नका, एकाच मंचावर दुजाभाव असेल तर एक वेळ,दोन वेळ सहन करा,परंतु तिसऱ्या वेळेस मात्र नक्की आवाज उठवा. मैत्रिणींनो आपली स्पर्धा जगाशी नसून स्वतःशी आहे हे कायम ध्यानात ठेवा. आपले वर्तन जगापासून आपल्याला लपवता येते,परंतु आत असलेला आत्मा मात्र आपल्या प्रत्येक कृतीचा साक्षीदार असतो,तो आतून; चूक की बरोबर आपल्याला वेळोवेळी सांगत असतो,पण आपण त्याचं ऐकलं पाहिजे ना? मैत्रिणींनो आपण महिला अत्यंत संवेदनशील असतो. आपल्या संवेदनशीलतेचा गैरफायदा घेऊन अनेकवेळा आपल्याच मैत्रिणी किंवा बंधूवर्ग आपली मने कलुषित करून,वाद निर्माण करून,आपल्या आडून फार मोठा घात करतात, त्यामुळे कोणत्याही आणि कसल्याही प्रलोभनांना,गोड बोलण्याला बळी न पडता योग्य तीच वाट आपण चालली पाहिजे. जिथे निमंत्रितांचं कवी संमेलन असतं ,तिथं माझी कविता वाचू द्या,म्हणून झोळी पसरू नका.ज्याचं साहित्य खऱ्या उंचीच असतं त्याला झोळी पसरण्याची गरजच पडत नाही. झोळी तोच पसरतो ज्याची प्रतिभा स्वतःची नसून चोरलेली किंवा उचललेली असते असे कोणी आपणास म्हणू नये,असे वाटत असेल तर विचारांची दिशा आणि उंची वाढवा आणि साहित्य प्रतिभेला कोणतेही गालबोट लागणार नाही याची दखल घेऊन आपली स्वतःची ही प्रतिमा उंचावण्याचा सतत प्रयत्न करा. चला तर ठरल्याप्रमाणे,आजपासून पुढील आठ मार्चपर्यंतचा कोणताही योग्य संकल्प करून, अध्यात्मात उन्नती करून,जीवशिव ऐक्यापर्यंत पोहोचण्याचा आणि प्रतिभावान होण्याचा प्रयत्न सफल करूया. आपणा सर्वांना महिला दिन हा महिला दीन न व्हावा या इच्छेसकट खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

ॲड.रजनी गिरवलकर
मो.नं.९८९०९५९५९४

एलॉन मस्क यांची खुर्ची धोक्यात! सीईओ पराग अग्रवालसह इतरांनी मस्कला खेचले कोर्टात; कारण काय?

नवी दिल्ली,-टेस्ला कंपनीचे सर्वेसर्वा एलॉन मस्क हे जगातील सगळ्यात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहेत. २०२२ साली जेव्हा त्यांनी एक्स (ट्विटर) हे ॲप विकत घेतले, तेव्हा त्यांनी कंपनीमध्ये अनेक मोठे बदल केले. त्यातील एक मोठा निर्णय म्हणजे कंपनीचे तत्कालीन सीईओ पराग अग्रवाल यांना काढून टाकणं हा होता. तर आता एक्स (ट्विटर) च्या काही माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्कला कोर्टात खेचलं आहे. ट्विटर खरेदी केल्यानंतर काही अधिकाऱ्यांना त्याने कामावरून काढून टाकलं होतं. तर आता या माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क विरोधात खटला दाखल केला आहे.यामध्ये कंपनीचे माजी सीईओ पराग अग्रवाल यांचाही समावेश आहे. माजी अधिकारी दावा करतात की, ऑक्टोबर २०२२ मध्ये एक्स (ट्विटर) वर नियंत्रण मिळवून मस्कने कंपनी ळए ४४ अब्ज, युएसडी ५४.२० प्रति शेअरमध्ये विकत घेतली होती. त्यांच्या योजनांमध्ये एक्स (ट्विटर)च्या संपादन किमतीवर एक वर्षाचा पगार आणि अनव्हेस्टेड स्टॉक अवॉर्ड्स %रत्ल् चा समावेश होता. पण, नोकरीवरून काढून

टाकल्यानंतर भरपाई म्हणून दिली जाणारी रक्कम चक्क १२८ मिलियन डॉलर्स पेक्षा जास्त एलॉन मस्कने अजूनही दिली नसल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे आणि एक्स (ट्विटर) चे माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क यांना कोर्टात खेचलं आहे.सोमवारी काही अधिकाऱ्यांनी कोर्टात एलॉन मस्क यांच्या विरोधात खटला दाखल केला आहे. यामध्ये एक्स (ट्विटर)चे माजी सीईओ पराग अग्रवाल, माजी सीएफओ नेड सेगल, माजी चीफ लीगल ऑफिसर (मुख्य कायदेशीर सल्लागार) विजया गड्डे आणि माजी जनरल काउंसिल सेन एजेट यांचा समावेश आहे. २०२२ मध्ये ज्या दिवशी मस्कने एक्स (ट्विटर) खरेदी केले, तेव्हा या अधिकाऱ्यांना विनाकारण काढून टाकण्यात आले होते.

कॅलिफोर्नियाच्या नॉर्दर्न डिस्ट्रिक्टमधील फेडरल कोर्टात दाखल करण्यात आलेल्या खटल्यात म्हटले आहे की, ''कोणतेही बिल न भरणे हा मस्कच्या स्वभावाचा एक भाग आहे. लोकांचे पैसे अडकवून ठेवून एलॉन मस्क इतरांना कोर्टाचे दरवाजे ठोकण्यास भाग पडतो. आपल्यावर कोणतेही नियम लागू होत नाहीत असं त्याला वाटतं''; असे माजी अधिकारी म्हणत आहेत. मस्कने आधी ट्विटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला, मात्र नंतर तो डीलमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी ट्विटरच्या स्टेकहोल्डर्सची बाजू माजी अधिकाऱ्यांनी धरली होती, त्यामुळे एलॉन मस्कला ट्विटर खरेदी करावे लागले. कारण त्याला त्यांचे विभाजन द्यायचे नव्हते. माजी अधिकारी म्हणतात की, एलॉन मस्कने खोटे कारण दिले आणि त्याचा निर्णय कायम ठेवण्यासाठी विविध कंपन्यांचे कर्मचारी नियुक्त केले. एलॉन मस्क त्याच्याशी असहमत असलेल्या कोणावरही कठोर कारवाई करण्यासाठी आपली संपत्ती आणि शक्ती वापरतो; असे यावेळी माजी अधिकाऱ्यांनी खटला दाखल करताना सांगितले आहे.

यशवंत महाशब्दकोडे

आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.साम ना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ



४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५९.वर ६१.सर ६२.नवागत ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ५३.माजघर ५५.कलम ६४.साम्य ६५.नापास ६७.म ७५.सोय ७७.गर ७८.धन ५६.पळपुटा ५७.रमताराम सलत ६८.सागवान ६९.गवा ७९.कंस

यशवंत
धाराशिव जिल्हा
शुक्रवार दि. ०८ मार्च २०२४
६
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

संकेतला न्याय मिळवून देण्यासाठी भीमसैनिक रस्त्यावर उतरणार

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – भिवंडी येथील संकेत भोसले या विद्यार्थ्यास सत्ताधारी पक्षातील गुंड प्रवृत्तीच्या गावगुंडांनी अतिशय क्रूरपणे व अमानुषपणे मारहाण केल्यामुळे त्याचा दि.२६ फेब्रुवारी रोजी तडफडून दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे त्या खुनातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी. तसेच मृत भोसले यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा यासह इतर विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील आंबेडकरी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा दि.११ मार्च रोजी काढण्यात येणार आहे.

भिवंडी येथील इयत्ता बारावीमध्ये शिकत असलेल्या संकेत सुनील भोसले याला मारहाण करणारा सत्ताधारी पक्षाचा पदाधिकारी असून तोच प्रमुख आरोपी आहे. त्यामुळे त्यास तात्काळ अटक करावी. त्याच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा व्हावी, भोसले याच्या परिवारास मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० लाख रुपयांची आर्थिक मदत तात्काळ करण्यात यावी त्याच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पाच एकर जमीन देण्यात यावी, जीवानिशी मारणाऱ्या मजूर आरोपीचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा त्या हत्याकांडातील फरार आरोपींना तात्काळ अटक करावी. तसेच प्रकरणाचे गांभीर्य न घेणाऱ्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. या मागण्यांसाठी आंबेडकरी समाजाच्यावतीने हा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा सकाळी साडेदहा वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघणार असून या मोर्चामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तुळजाभवानीची शपथ अमित शहानींच ते वचन तोडले - उद्धव ठाकरे

गडकरींना महाविकास आघाडीकडून निवडून आणू

अबकी बार भाजपा तडीपार

तुम्ही मला माझ्या कुटुंबातील एक सदस्य आहात. माझी आहे म्हणून मुख्यमंत्री असताना माझ्या संकल्पनेतून माझे कुटूंब, माझी जबाबदारी हे अभियान राबवून कोरोनाच्या महामारी काळात प्रत्येकाच्या आरोग्यासाठी मी जसे सांगितले तसे आपण ऐकले म्हणून आपण सर्वजण निरोगी राहू शकलो. त्यामुळे एक नंबरचा व चांगला मुख्यमंत्री म्हणून जगामध्ये गणना झाली. हा बहुमान माझा नसून त्यांनी सांगताच प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला. तर दुसरीकडे प्रधानमंत्री मेरा परिवार असे सांगतात पण त्या परिवाराची जबाबदारी घेणार कोण हे का सांगत नाहीत. असा प्रश्न विचारीत मी जबाबदारी घेतो तुम्ही घेता का ? थेट सवालही त्यांना विचारला.

धाराशिव/ उमरगा (प्रतिनिधी) – २०१९ अमित शहा यांनी मातोश्रीवर येऊन शिवसेनेचा मुख्यमंत्री अडीच वर्षे व भाजपाचा मुख्यमंत्री अडीच वर्षे होईल, असे वचन गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते. मात्र आता ते मी वचन दिलेच नाही अशी बोंब मारीत असले तरी मी आई तुळजाभवानीची शपथ घेऊन सांगतो की, होय अमित शहा यांनी मला मातोश्रीवर येऊन अडीच – अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद वाटून घेण्याचे वचन दिले असल्याचे ठासून व ठाम प्रतिपादन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी दि.७ मार्च रोजी जाहीर सभेत केले. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे भाजपाने जाहीर केलेल्या यादीत नाव नसून त्यांना एक प्रकारे लावले आहे. त्यामुळे गडकरी यांनी महाविकास आघाडी करून निवडणूक लढावी आम्ही त्यांना निवडून आणू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद यात्रेत ते बोलत होते. यावेळी शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर, शिवसेना नेते खासदार संजय राऊत, आ कैलास पाटील, प्रवक्त्या सुषमा अंधारे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष केशव उर्फ बाबा पाटील, महिला आघाडी प्रमुख शामलताई वडणे, महेश देशमुख, नाना भोसले, विजय वाघमारे, सुभाष राजोळे, आश्लेष मोरे, अमित चौधरी आदींसह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना शिवसेना पक्षप्रमुख ठाकरे म्हणाले की, अट्टल व सच्चा शिवसैनिक काय असतो हे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील हे मुर्तीमंत उदाहरण आहेत असे सांगत त्या दोघांचे जाहीर अभिनंदन केले. तर १९९५ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सभेत एक साप निघाला होता. त्याला आपण दूध पाजले. तर तो आता कोरेक्स पित आहे, त्या सापाला त्याची जागा बरोबर दाखवायची असा जबरदस्त प्रहार करीत माजी खासदार प्रा रवींद्र गायकवाड व आमदार चौगुले यांना कोणत्याही परिस्थितीत मातीत गाढायचेच असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्याबरोबरच काँग्रेस मधून भाजपा मध्ये गेलेल्या बसवराज पाटील यांचाही शेलक्या शब्दांत समाचार घेतला. तसेच मी राज्यभर संवाद यात्रेच्या माध्यमातून फिरत आहे या सभेमध्ये इतर सर्व खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांनी जी निष्ठा दाखविली. त्यामुळे महाराष्ट्र त्यांच्या निष्ठेला सलाम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. या दोघांना आजही आमिष दाखविण्यासह दबाव देखील आणला जात आहे. त्याला लाथाडून दोन वीर उभे असल्याचे त्यांनी सांगितले. मोदी व शहा यांनी पक्ष फोडाफोडीचे घाणेरडे काम व करीत आहेत. मात्र महाराष्ट्रातील जनता या गद्दारांना गाडायला तयार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच माजी खासदार रवींद्र गायकवाड व आमदार ज्ञानराज चौगुले यांना इथे पाय रोवू देणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यांबरोबरच मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात आमच्याबरोबर येत असून आमचे हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे. तसेच घरातली चूल पेटवणारे हिंदुत्व आहे. मात्र भाजपाच्या गोमूत्रधारी हिंदुत्व असून घर पेटविणारे असल्याचा टोला त्यांनी लगावला. तसेच येणारी निवडणूक ही अतिशय महत्त्वाची असून ही लढाई भावी पिढीसाठी असून उद्या आम्ही जिंकणारच असा विश्वास व्यक्त करीत ज्यांना भाजपमध्ये जायचे असेल त्यांनी आता जावे असा सल्लाही त्यांनी दिला. भाजपाने जरी आमदार खासदार विकत घेतले असले तरी पन्नास खोक्यांमध्ये संपूर्ण राज्यातील जनता तुम्हाला विकत घेता येणार नाही असा टोला लागावं ही जनता लाचार नसल्याचे सांगत आम्ही श्रीरामाचे भक्त आहोत असा इशाराही त्यांनी मोदी – शहा यांनी दिला. विशेष म्हणजे मोदी यांच्यामुळेच ओमराजे खासदार झाले अशी बोंब भाजपाची मंडळी मारीत असली तरी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादानेच गेली २५ वर्षे भाजपाला आमच्या सोबत सत्तेमध्ये येता आले असे सांगत भाजपची कुंडलीच चव्हाट्यावर मांडली. त्यावेळी मोदी किंवा शहा नव्हते. विशेष म्हणजे शिवाजी कांबळे व कल्पना नरहीरे या खासदार झाल्या. तेव्हा मोदी हे लोकांना नाव देखील माहित नसल्याचा सणसणीत टोला त्यांनी लगावला. भाजपाने गद्दारांना सोबत घेऊन शिवसेना व पक्ष चिन्ह देखील मींद्यांना दिला आहे. मात्र आता वरून बोंब मारतात की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे नव्हतेच. तर मग तुम्ही मातोश्रीवर कोणाला भेटायला आला होतात ? असा प्रश्न विचारीत ते म्हणाले की, मी पुन्हा शिवसैनिकच मुख्यमंत्री करणार असल्याचा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे भाजप घराणेशाही या नावाने बोंब मारत आहेत. होय मी घराणेशाहीला मानतो. कारण मी माझ्या आई–वडिलांना मानणार आहे. मात्र मोदी व शहा हे त्यांच्या त्यांच्या आई–वडिलांना मानतात का नाही ? हे माहीत नाही. त्यामुळे त्या दोघांनी एकदा जनतेसमोर येऊन जनतेसमोर येऊन त्यांच्या सात पिढ्यांचा लेखाजोखा होऊन जाऊद्या. मी देखील माझ्या सात पिढ्यांचा लेखाजोखा जनतेसमोर सांगण्यास तयार असल्याचे खुले आव्हान त्यांनी मोदी– शहा यांना दिले. ही निवडणूक तुमच्यासाठी, तुमच्या मुलांबाळांसाठी व त्यांच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच या निवडणुकीत आपण हरलात तर लोकशाही मेली व तिचा मुडदा पडेल असे सांगितले. त्यामुळे प्रत्येकांनी आपली जात, धर्म बाजूला ठेवून आपल्या व मुलांच्या भविष्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आमदार दानवे, सुषमा अंधारे, खासदार राजेनिंबाळकर यांच्यासह इतरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

निवडणुकीत धार्मिक प्रचाराला बंदी मोदी शहा यांच्यावर कारवाई का नाही ?

निवडणूक आयोगाने प्रचारादरम्यान धार्मिक प्रचार करण्यास बंदी घातली आहे. एकीकडे प्रधानमंत्री मोदी जय बजरंग बली म्हणा आणि मतदान करा असे सांगतात. तर दुसरीकडे अमित शहा जय श्रीराम म्हणा मी तुम्हाला राम लल्लाचे फुकट दर्शन घडवितो असे आमीष दाखवितात. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक प्रचारादरम्यान उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर तत्कालीन निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी कारवाई करीत मतदान करण्यास बंदी घातली होती. मात्र विद्यमान निवडणूक आयोगाचे आयुक्तांनी दोघांवरही प्रचाराचे उल्लंघन केल्या प्रकरणी कारवाई का केला नाही ? असा प्रश्न विचारीत निवडणूक आयोगालाच धोंडोबा असे संबोधित आता तरी कारवाई करा अशी मागणी केली.

५५२ कुळे उतरली तरी शिवसेना पक्ष संपू शकणार नाही !

शिवसेना पक्ष संपला असा आव आणण्याचे काम भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे वारंवार करतात. तसेच देशातील सर्व छोटे छोटे पक्ष संपवून टाका असे केंद्रीय अध्यक्ष नड्डा सांगत आहेत. मात्र बावनकुळेच काय पाचशे बावनकुळे आणली तरी शिवसेना पक्ष कोणीही संपू शकत नसल्याचा जबरदस्त टोला ठाकरे यांनी लगावला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेस मुदतवाढ

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतीगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावेत यासाठी भोजन भत्ता, निवास भत्ता व निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजनेमधून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी नवीन व नुतनीकरण अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करण्यासाठी www.syo.mahasamajkalyan.in ही वेबसाईट ८ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आली होती. तर २९ फेब्रुवारी हा ऑनलाईन प्रणालीवर अर्ज सादर करण्यासाठी अंतिम दिनांक देण्यात आला होता. परंतू बऱ्याच विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू असल्याने,तांत्रिक कारणास्तव तथा इतर कारणांमुळे विहीत मुदतीत अ वोर्ज भरता आला नसल्याने या योजनेसाठी ऑनलाईन प्रणालीवर अर्ज सादर करण्यासाठी व सदरील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव या कार्यालयाकडे जमा करण्यासाठी दि.१५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेसाठी धाराशिव नगर पालिका हद्दीतील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे www.syo.mahasamajkalyan.in या वेबसाईटवर अर्ज भरून ऑनलाईन भरलेल्या अर्जाची एक प्रत (प्रिंट) आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव या कार्यालयाकडे १५ मार्च २०२४ पूर्वी जमा करावी.असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

ॲड. फरहीन खान – पटेल सामाजिक सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित

उमरगा दि.७ (प्रतिनिधी) – जागतिक महिला दिनानिमित्त शांतीदूत परिवारा पुणे तर्फे सेवा गौरव पुरस्कार प्रदान सोहळा २०२४ तसेच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यातील विविध क्षेत्रातील महिलांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सेवा रत्न गौरव पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले.

मिसेस युनायटेड भवानी राकेश कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया बेर्डे, उद्योजिका सुप्रिया बडवे, सौ.सुनीता राजे पवार (संस्कृती प्रकाशन पुणे), राज्याचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव , शांतीदूत परिवाराच्या संस्थापिका सौ. विद्याताई जाधव, राष्ट्रीय अध्यक्षा तृषाली जाधव, युनीटी हॉस्पिटलच्या डॉ. प्रिती काळे, डॉ. अमित काळे, उद्योजक हर्षल गौंड पाटील, माजी मुख्य अभियंता प्रल्हाद साळुंखे, डॉ. वेंकट साई, अभिनेत्री रोहिणी कोलेकर, सुरेश सकपाळ, विजया नागटिलक, मधुकर चौधरी आदी उपस्थित होते.

ॲड.फरहीन खान – पटेल गेल्या अनेक वर्षापासुन तालुक्यातील महीलांमध्ये कायदेविषयक जनजागृती, विविध महापुरुषांच्या जयंतीनिमीत्त त्यांच्या विचार पोंहचविणे व विविध विषयावर समाज प्रबोधन करण्याचे ते कार्य करीत असतात. ड.फरहीन खान – पटेल व्यवसायाने उमरगा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात अधिवक्ता आहेत. त्या २०१२ पासून वकिली क्षेत्रात कार्यरत असून कायदे विषयक शिबिरा मार्फत तसेच अंगणवाडी, शाळा, महाविद्यालय, बचत गटातील महिलांसाठी व किशोरवयीन मुला–मुलींसाठी त्यांचे

अधिकार, हक्क, जबाबदाऱ्या तसेच उज्वल भविष्याबद्दल मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये सक्षमीकरण, सशक्तीकरण आणि जागरूकता आणण्याचे कार्य त्या करीत असतात. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून ड.फरहीन खान – पटेल यांचे अभिनंदन होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तृषाली जाधव यांनी तर सूत्रसंचालन हभप विजय बोत्रे यांनी व आभार मोनिका भोजकर यांनी मानले.

लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत – न्या. शेंडे

धाराशिव दि.७ (प्रतिनिधी) – भारतीय राज्य घटनेत कल्याणकारी राज्याची संकल्पना आहे. समानतेचा अधिकार राज्यघटनेने दिला आहे. आजही विविध शासकीय योजनांचा लाभार्थ्यांना मिळण्यासाठी विविध अडचणींचा सामना करावा लागतो. शिक्षणाचा अभाव आणि गरिबी याबाबी यासाठी कारणीभूत आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी दि.७ मार्च रोजी केले.

धाराशिव शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने आयोजित शासकीय योजनांच्या महामेळाव्याच्या अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा न्यायाधीश राजेश गुप्ता, अपर पोलीस अधीक्षक गौहर हुसेन, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड.मिलिंद पाटील व धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी वसुधा फड आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना न्या. शेंडे पुढे म्हणाल्या की, शासकीय योजनांची जनजागृती व्हावी, लाभार्थ्यांना योजनांची माहिती मिळावी व त्यांना योजनांचा लाभ मिळावा हा या महामेळाव्याच्या आयोजनाचा उद्देश आहे.समाजातील सामाजिक व आर्थिक विषमता दूर झाली पाहिजे यासाठी शासनाने विविध घटकातील लाभार्थ्यांसाठी विविध योजना सुरू केल्या आहे. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम शासकीय यंत्रणा करते.जिल्ह्यात असे काही समाज घटक आहे की,ज्यांच्याकडे आजही आधार कार्ड शिधापत्रिका व मतदार ओळखपत्र नाही अशा लाभार्थ्यांचा यंत्रणांनी शोध घेऊन त्यांनाही कागदपत्रे उपलब्ध करून दिली आहे. ज्या समाजाला गुन्हेगारीचा ठपका लागला आहे. तो मिटविण्यासाठी त्या समाजाला विविध योजनांचा लाभ देऊन त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासकीय योजनांचा लाभ देण्यात काही अडचण येतात. त्या दूर केल्या पाहिजे असे सांगून त्या म्हणाल्या की, यंत्रणांनी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून विविध योजनांच्या लाभापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा. विधी सेवा प्राधिकरणाचा १५१०० हा टोल फ्री क्रमांक आहे. या माध्यमातून विधी सेवा प्राधिकरण कुणाला कायदे विषयक तसेच शासकीय योजनांच्या मदतीची आवश्यकता असल्यास मदत करण्यास तयार आहे. आर्थिक आणि शैक्षणिक बाबी सुधारल्या तर सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होते. जे गुन्हे व वाद निर्माण होतात. ते सोडविण्याचे काम कायद्याच्या चौकटीत बसून विधी सेवा प्राधिकरण करते. कधी कधी शासकीय योजनांचा लाभ घेताना कायदेशीर अडचणी येतात.योजना ह्या कायद्यातून निर्माण झाल्या आहे. विविध विभागाने आपले काम केवळ आपल्यापुरते मर्यादित न ठेवता सर्व शासकीय विभागांनी एकत्र येऊन अशा प्रकारच्या महामेळाव्यातून शासकीय योजनांची माहिती व योजनांचा लाभ नागरिकांना व लाभार्थ्यांना देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर डॉ घोष म्हणाले की, पूर्वी शासन काही वस्तू खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप करायचे.आता मात्र डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थीच दर्जेदार वस्तू खरेदी करतात. लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट अनुदान जमा होते. डीबीटीमुळे लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा होत असल्याने मध्यस्थांचे उच्चाटन झाले आहे. ज्या वस्तू पूर्वी लाभार्थ्यांना मोफत मिळायच्या,त्याचे महत्त्व लाभार्थ्यांना नसायचे. आता मात्र लाभार्थी थेट चांगल्या दर्जाच्या वस्तू आधी पैसे देऊन खरेदी करतात व अनुदान नंतर त्यांच्या खातात जमा होते. त्यामुळे पारदर्शकता आली असल्याचे त्यांनी सांगितले. कुलकर्णी म्हणाले,शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास कधी कधी अडचणी येतात.मात्र ह्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजे यासाठी पोलीस विभाग तत्पर आहे.पहाट उपक्रमाच्या माध्यमातून शेतीच्या विविध योजना शेतकरी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. जास्तीत जास्त योजना या वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.जिल्ह्यातील ज्या वंचित घटकातील लाभार्थ्यांचे आधार कार्ड काढले नव्हते त्यांचे आधार कार्ड काढून देण्यात आले. त्यामुळे जास्तीत जास्त योजनांचा लाभ या लाभार्थ्यांना देण्यात येत आहे. त्यामुळे हा समाज गुन्हेगारीकडे न वळता विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल. प्रत्येक विभागाने शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे काम केले पाहिजे,तेव्हाच लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल असे त्यांनी सांगितले.

ॲड. पाटील म्हणाले की, काळानुसार बदल झाला आहे.माहितीचा अधिकार कायदा आला आला आहे.त्यामुळे पारदर्शकता वाढली आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकारत आहे. शेवटच्या व्यक्तीला शासकीय योजनांचा लाभ मिळाला पाहिजे या भूमिकेतून काम करण्यात येत आहे. गरजू व गरीब लाभार्थ्यांपर्यंत विविध योजना पोहोचण्याची काम या महामेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विष्णू कांबळे, सुरेखा पेठे,हपांडुरंग डोळस, दीपक रणखांब या लाभार्थ्यांना शिधापत्रिका, प्रमिला सोबाजी, सुनीता दंडगुले, हमनीषा कारभारी, पोपट गायकवाड व सुरेश गायकवाड या लाभार्थ्यांना कामगार विभागाचे नोंदणी कार्ड, कालिंदा गायकवाड, लक्ष्मी मोटे, कमल शर्मा, रत्नमाला बोरगावे यांना विधवा व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्यात आला. प्रारंभी मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाला न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्या.वसंत यादव यांनी तर सूत्रसंचालन ॲड. भाग्यश्री रणखांब यांनी व उपस्थितांचे आभार ॲड अमोल गुंड यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

महामेळाव्यात विविध विभागाचे स्टॉल

शासकीय योजनांच्या महामेळाव्यात विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, आरोग्य, कृषी, महसूल, उपप्रादेशिक परिवहन विभाग, कामगार विभाग, रेशीम विकास विभाग, नगर परिषद, शिक्षण, महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद तसेच विविध महामंडळाच्या स्टॉलचा समावेश होता. नागरिक व लाभार्थ्यांनी स्टॉलला भेट देऊन योजनांची माहिती जाणून घेतली. तसेच विविध विभागाच्या स्टॉलवर उपलब्ध असलेले माहिती पत्रके, घडी पुस्तिका व पॉम्पलेट स्टॉलवरील कर्मचाऱ्यांनी नागरिकांना व लाभार्थ्यांना वितरित केले. प्रारंभी मान्यवरांनी विविध विभागाच्या स्टॉलला भेट देऊन त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती जाणून घेतली. शासकीय योजनांच्या महामेळाव्याच्या यशस्वितेसाठी जिल्हा न्यायालय, विधी सेवा प्राधिकरण तसेच विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

सोन्याने...

उच्चांक गाठला. अवघ्या ४८ तासांत भाव गगनाला भिडले. दोन हजारांची रेकॉर्डब्रेक चढाई सोन्याने केली आहे. आज, ७ मार्च रोजी सुवर्णनगरीत ६४,५०० रुपये असा सोन्याचा भाव आहे. जीएसटीसह सोन्याचा भाव ६६ हजार रुपयांच्या घरात पोहोचतो. त्यामुळे ऐन लग्नसराईत ग्राहकांच्या खिशावर ताण आला आहे. त्यांना आज अधिक पैसे मोजावे लागत आहेत. जळगावात चांदीच्या भावात ७०० रुपयांची घसरण होऊन ती ७२ हजार ८०० रुपये प्रति किलो वर आली.

मुंबईकरांना...

मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त पी. वेलरासू, डॉ. सुधाकर शिंदे, उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे, उपआयुक्त (परिमंडळ २) प्रशांत सपकाळे आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

युक्रेनचे...

युरोपियन कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्सने केलेल्या सर्वेक्षणात या युद्धासंदर्भात एक अतिशय मनोरंजक गोष्ट समोर आली आहे. युरोपियन कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्सच्या सर्वेक्षणानुसार, युरोपमधील बहुतेक लोक रशिया विरुद्धच्या युद्धात युक्रेनला पाठिंबा देताना दिसत आहेत. पण असे असले तरी एका सर्व्हेनुसार, केवळ १० टक्के लोकांनाच युक्रेन युद्ध जिंकू शकेल असा विश्वास आहे, तर बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की हे युद्ध केवळ करारानेच संपुष्टात येऊ शकते.

दिल्लीकरांना २००..

सौर धोरण २०२४ बद्दल माहिती देताना मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले होते की उद्योग चालविणाऱ्या लोकांनाही या अंतर्गत फायदा होईल. आपल्या व्यावसायिक युनिट्सवर सौर पॅनल बसवल्यास लोकांचे वीज बिल निम्म्याने कमी होऊ शकते. तसेच, जे आपल्या घराच्या छतावर सौर पॅनेल लावतात, त्यांना वीज कितीही युनिट वापरली तरी शून्य बिल भरावे लागेल असेही दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते.

दिल्ली सौर धोरणांतर्गत, केजरीवाल सरकारने पुढील तीन वर्षांत ५०० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या सर्व सरकारी इमारतींमध्ये सौर पॅनेल बसवणे अनिवार्य करण्याची योजना आखली आहे. यासंदर्भात ऊर्जा मंत्री आतिशी म्हणाल्या होत्या की नवी दिल्ली सौर धोरणाला कॅबिनेटने मंजुरी दिली आहे आणि १० दिवसांच्या आत अधिसूचित केले जाण्याची शक्यता आहे.

सट्टेबाजी आणि...

प्रोत्साहन यामध्ये कुठल्याही प्रकारचा संबंध बेकायदेशीर असल्याचे लक्षात घेऊन, बेकायदेशीर कारवायांमधील कोणाचाही सहभाग तितकाच जबाबदार मानला जाईल, असा इशारा कलाकार, खेळाडू आणि इतर आदर्श मानल्या जाणाऱ्या व्यक्तींना या सूचनेव्दारे दिला गेला आहे.

सट्टेबाजी आणि जुगार यापुरताच या सूचना मर्यादित नसून यासोबतच कायद्याने प्रतिबंधित गोष्टींचे कुठल्याही प्रकारे समर्थन किंवा जाहिरात कडक तपासणीच्या अधीन असेल, अस इशारा सीसीपीएने या सल्लात्मक सूचनांच्या माध्यमातून दिला आहे. सल्लात्मक सूचनांचे उल्लंघन आढळल्यास ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ नुसार उत्पादक, जाहिरातदार, प्रकाशक, मध्यस्थ, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, समर्थक आणि संबंधितांसह सहभागी असलेल्यांविरोधात कठोर कारवाई सुरू केली जाईल.

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने सर्व भागधारकांना या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आणि भारतीय कायद्यानुसार बेकायदेशीर असलेल्या कृत्यांना प्रोत्साहन देण्याचे किंवा त्यांचे समर्थन करणे, टाळण्याचे आवाहन केले आहे.

युवा नेते ऋषिकेश....

महाराष्ट्र प्रदेश सचिव असून, युवा चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे. लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील नमो चषक कला क्रीडा स्पर्धेचे मुख्य संयोजक म्हणूनही त्यांनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा राजकीय संस्कार घेवूनच ऋषिकेश कृषी क्षेत्रातही घोडदौड करीत आहेत. आत्मनिर्भर भारत या संकल्पनेतून त्यांनी कौशल्या सिल्क रिलिंग उद्योगाची उभारणी करून जवळपास १५० स्त्री-पुरुषांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या उद्योगावर आधारित बहुसंख्य शेतकऱ्यांची तुती लागवडीच्या माध्यमातून आर्थिक उन्नती करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गोरगरीब रुग्णांना वेळोवेळी त्यांनी एमआयटी मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून मदतीचा हात दिला आहे. अनेक वैद्यकीय तपासणी शिबीरे आयोजित करून त्यांनी ग्रामीण भागात आरोग्य सेवा दिली आहे. विविध धार्मिक व सामाजिक कार्यातही ते हिरीरीने भाग घेतात. नवभारत ॲचिव्हर्स पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी ते आजच मुंबईमार्गे दुबईला आपले बंधू पृथ्वीराज यांच्यासोबत रवाना झाले.

महिला...

उज्ज्वला पाटील, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, जिल्हा व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण अधिकारी मनीषा बोरूळकर यांच्यासह प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त रामदास कोकरे यांची यावेळी उपस्थिती होती.

प्रत्येक महिला ही समाजातील महत्वाची घटक आहे. शासकीय कार्यालयात अधिकारी अथवा कर्मचारी आणि कुटुंबात आई, बहिण, पत्नी, मुलगी अशी जबाबदारी पार पाडणारी महिला स्वतःकडे मात्र दुर्लक्ष करते. आपले स्वतःचे व्यक्तिमत्व जपणे तिला जमत नाही. महिलांनी आपले स्वतंत्र व्यक्तिमत्व जपायला हवे. आपल्या आरोग्याकडे, आवडी आणि छंद जोपासण्याकडे लक्ष द्यायला हवे. कार्यालयीन काम आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना वेळेचे योग्य नियोजन करून स्वतःसाठी काही वेळ काढायला हवा, असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केले. तसेच आयुष्यात प्रत्येक महिलेने स्वतःचे अस्तित्व जपताना विचारपूर्वक निर्णय घ्यावेत. आपली भूमिका स्पस्थ ठेवून वाटचाल करावी, असे त्यांनी सांगितले.

कुस्तुरी सोमय मुंडे यांनी सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देवून एकमेकींना मदत करीत प्रगती साधण्याचे आवाहन केले. प्रा. अंजली जोशी टेंभूर्णीकर यांनी यावेळी महिलांना ङ्गपुस्तिकांची भिशीफ संकल्पना समजावून सांगितली. तसेच डॉ. सुवर्णा बिराजदार यांनी आहार, मानसिक तणावाचे व्यवस्थापन आणि जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी केले. महसूल, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा कोषागार कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभागासह इतर शासकीय विभागातील महिला कर्मचारी यावेळी उपस्थित होत्या.

विविध विभागात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता कामगार, पोलीस कॉन्स्टेबल, एस.टी. महामंडळातील वाहक, ग्रामसेविका, कृषि सहायक, तलाठी, मंडळ अधिकारी, कोतवाल, पोलीस पाटील, भूमी अभिलेख विभागात मोजणीदार, आशा, अंगणवाडी सेविका आदी प्रत्यक्ष फिल्डवर जावून काम करणाऱ्या प्रत्येक पदावरील पाच महिलांचा यावेळी भेटवस्तू देवून सन्मान करण्यात आला.

महिला कर्मचाऱ्यांसाठी ङ्गपुस्तिकांची भिशीफ

महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी पुस्तक वाचनाची आवड जोपासावी, यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ङ्गपुस्तिकांची भिशीफ उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु करण्यात आला. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांनी रोज थोडा तरी वेळ पुस्तक वाचनासाठी द्यावा, त्या पुस्तकाविषयी आपले समीक्षण मांडावे, हा उद्देश आहे. प्रत्येक महिला कर्मचाऱ्याने आपल्याकडील पुस्तके भिशीत जमा करावीत, तसेच भिशीतून नवनवीन पुस्तके प्राप्त करून त्याचे वाचन करावे, असा या उपक्रमाचा उद्देश आहे.

देशातील...

२. पहिली नोकरी पक्की : प्रत्येक डिप्लोमा किंवा पदवीधरांना सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील कंपनीत एक वर्ष अप्रेंटसशिप दिली जाईल. यासोबतच, १ लाख रुपये (८५००/महिना) मिळेल.

३. पेपर लीकपासून स्वातंत्र्य : सार्वजनिक परीक्षांमध्ये पेपर लीक टाळण्यासाठी आणि निष्पक्ष परीक्षा घेण्यासाठी नवीन कायदा केला जाईल. याद्वारे कोट्यवधी तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होण्यापासून रोखले जाईल.

४. गिग इकॉनॉमीमधील सामाजिक सुरक्षा : काँग्रेस गिग इकॉनॉमीमध्ये दरवर्षी रोजगार शोधणाऱ्या लाखो तरुणांसाठी चांगल्या कामाची परिस्थिती आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कायदा आणला जाईल.

५. युवा रोशनी : काँग्रेस पाच वर्षांच्या कालावधीसाठी देशातील सर्व जिल्ह्यांसाठी ५,००० कोटी रुपयांचा निधी तयार करेल. ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे तरुण कोणत्याही क्षेत्रातील त्यांच्या स्टार्ट-अपसाठी हा निधी मिळवण्यास पात्र असतील.

वन मजुरास दोन हजार रुपयाची लाच घेताना अटक

भूम दि.७ (प्रतिनिधी) - शेतातील वाळलेली झाडे तोडण्यासाठी वनपरिक्षेत्र कार्यालयाकडून परवानगी मिळवून देण्यासाठी दोन हजारांची लाच घेणार्या भूम वन परिक्षेत्र कार्यालयातील वन मजूर रियाज रशीद किल्लेदार यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दि.७ रंगेहाथ पकडले आहे. भूम तालुक्यातील एका तक्रारदार शेतकर्याच्या आईने त्यांच्या मालकीच्या गट नं. १२ मधील जमिनीत असलेली वाळलेली झाडे तोडण्याची परवानगी मिळण्यासाठी १६ फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल केला होता. झाडे तोडण्याची परवानगी वरिष्ठांकडून मिळवून देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक रियाज रशीद किल्लेदार याने तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने धाराशिव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. त्यानुसार दि.७ मार्च रोजी सापळा रचून वनमजूर रियाज किल्लेदार यास तक्रारदाराकडून लाच घेताना रंगेहाथ पकडले. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER- PATEL KHAIRAT HIMMATSAHEB TO: KHAIRAT HIMMAT PATEL HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE KHAIRAT HIMMAT PATEL IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

OLD NAME-PATEL KHAIRAT HIMMATSAHEB
NEW NAME- KHAIRAT HIMMAT PATEL
ADDRESS- HALDURG TQ AUSA DIST LATUR 413520

टी. सी. हरवली आहे

सुयश सुभाष हुलपल्ले मुरूम ता. उमरगा जि.धाराशिव यांची १२ वी पासची टी. सी. मुरूम ते धाराशिव प्रवासादरम्यान हरवली आहे. सापडल्यास ताबडतोब संपर्क साधावा.

मोबा. नं. ८७८८४०९७९५.

बालाजी अर्बन कॉ-ऑप क्रेडिट सोसायटी लि.,

शिवाजी चौक, मोंडा रोड, मार्केट यार्ड, उदगीर

सोने तारण लिलावाची जाहीर नोटीस

कर्जदाराचे नाव	सिन्नस	चोख वजन	लिलावाची तारीख	स्थळ	येणे रक्कम
अंबादास वैजनाथ आम्लापुरे	लाँग गंठन १ नग	२५.८७०	२१/०३/२०२४	संस्थाऑफिस	१,५३,८९७/- आणि पुढील व्याज आणि खर्च
अमोल लक्ष्मणराव टाकळे	नेकलेस १ नग	८.७५० ग्राम	२१/०५/२०२४	संस्था ऑफिस	४२,४३७/- आणि पुढील व्या आणि खर्च
सुजित सुधाकर सुधाकर फुलारी	बांगडी १२ नग	२३.७५०	२१/०३/२०२४	संख्या ऑफिस	१,४४,७७४ आणि पुढील व्याज खर्च

सदरिल उल्लेख केलेला सिन्नस कर्जदार श्री अंबादास आलमापुरे, श्री. अमोल लक्ष्मणराव टाकळे आणि श्री सुजित सुधाकर फुलारी यांना मुदत संपल्यामुळे सोडवुण घेण्यासाठी सोने तारण लिलावची नोटीस त्यांना दि. ०५/०३/२०२४ रोजी पोष्ट पोहोच पावतीसह पाठवलेली आहे. संस्थेच्या सोने तारण कर्जाची वसुली करण्याकरिता सदरील जिन्नस विकुण आलेली रक्कम सदरील कर्जदाराच्या खात्यात भरली जाईल सदरील लिलावाचा खर्च त्यांच्याकडून वसुली केला जाईल लिलाव करुण देखील सदरील खात्यात येणे रक्कम राहिल्यास ती कर्जदाराकडुन सहकारी कायद्यातील तरतुदी प्रमाणे वसुल केली जाईल.

तरी तमाम लोकांस कळविण्यात येते की, दि. २१/०३/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात लिलाव प्रक्रियेत भाग घेवून सहकार्य करावे.

टिपः लिलावाच्या अटी व शर्ती लिलावापूर्वी वाचून दाखवण्यात येतील याची नोंद घ्यावी.

हि जाहीर लिलाव नोटीस प्रसिद्ध केली.

तारीखः ०७/०३/२०२४

शाखा व्यवस्थापक
बालाजी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी
लि., उदगीर ता. उदगीर जि. लातूर

जाहीर प्रगटन

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी औसा यांचे कार्यालय (भूसंपादन/भूसुधार/कुळ/सिलींग विभाग)

क्रमांक-२०२३/मुसुधार/कुळ कावी-७७/२५५
दिनांक- १२/०१/२०२४

विषय मौजे वडजी ता. औसा येथील स.नं. ६३/६४ च्या ७/१२ च्या सातबारा उताऱ्यामधील इतर हक्काच्या रकान्यातील कुळाची नोंद कमी करणेबाबत.

मौजे वड़जी ता. औसा जि. लातूर येथील सर्व जनतेस कळविण्यात येते की, मौजे वडजी ता. औसा येथील स.नं.६३/६४ घ्या ७/१२ च्या सातबारा उता-यामधील इतर हक्काच्या अधिकाराच्या रकान्यातील कुळाच्या नावाची नोंद कमी करणेबाबत श्रीम. राजुबाई लक्ष्मण माळी रा. वडजी ता औसा यांनी या कार्यालयास अर्ज दाखल केला आहे. तरी सदरील मौजे वडजी ता. औसा जि.लातूर येथील जमिन सर्वे नं.६३/६४ च्या ७/१२ उता-यामधील इतर हक्काच्या/अधिकाराच्या रकान्यातील साधे कुळाची नोंद कमी करणेबाबतचा कोणाचा आक्षेप असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी पासून ०७ (सात) दिवसाचे आत तहसील कार्यालय औसा हजर राहून आपला आक्षेप नोंदविण्यात यावा,

उक्त कालावधीनंतरचे आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत व सदरील मौजे वडजी ता. औसा येथील जमिन सर्वे नं.६३/६४ च्या ७१२ उता-यामधील इतर हक्काच्या अधिकाराच्या रकान्यातील साधे कुळाची नोंद नियमानुसार कमी करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तहसीलदार औसा

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.९६७/२०२३
निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Narsing S/o Ramachandra Gitte हे दि.१८/१२/२०२२ रोजी जळकोट जि.लातूर येथे मयत झाले आहेत आणी अर्जदार Tanaji S/o Narsing Gitte age:35 Yrs;Occu. Agri
R/o Gutti Tq. Jalkot Dist .Latur
यांनी खालील नमुद एक व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1) Tanaji S/o Narsing Gitte - age:69--Son
2) Kantabai W/o Narsing Gitte age-60 Wife
3) Shivnanda W/o Dnyanoba Kandre -40--Daughter
4) Chandrasen S/o Narsing Gitte age-33--Daughter
-अर्जदार याने Narsing S/o Ramachandra Gitte या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Narsing S/o Ramachandra Gitte यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका ५/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-१५/०४/२०२४/

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
एस.एम. शेटे
साह्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,उदगीर

जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दा.२०/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार शेख मजहर सलाहुद्दीन रा.उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दि.०८/०१/१९८८ मोजे उदगीर ता.उदगीर जि.लातूर येथेझाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहिला त्यांची जन्म नोंदकरण्यात आलेली नाही.सदरिल अर्जदार शेख मंजहर सलाहुद्दीन रा.उदगीर ता.उदगीर त्यांचा जन्म दि.०८/०१/१९८८ रोजीची नोंद जन्म मृत्यु नोंदवहिला घेणेबाबत संबधितास आदेशित करणे बाबत या न्यायालयात दि.१६/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दि.०८/०१/१९८८ रोजी झाले बाबत कोणास आक्षेपअसेल तर या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचू आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपलेम्हणने दाखल करावे,सदरिल मुदतित कोणी म्हणने दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार शेख मजहर सलाहुद्दीन रा.उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दि.०८/०१/१९८८ रोजीची नोंदमुख्याधिकारी नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म -मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबधितास आदेशित करण्यात येईल.

आज दि.२०/०२/२०२४ रोजी दिले.
पुढिल नेमलेली तारिख :-२१/०३/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा
तहसिलदार उदगीर

टी. सी. हरवली आहे

माझी शेख मुस्कान महताबसाब या नावाची बारावी पासची मुळ टि.सी. व मार्क मेमो ४ मार्च २०२४ रोजी लोणी ते उदयगीरी कालेज दरम्यान प्रवासात हरवली आहे. सापडल्यास खालील पत्तावर संपर्क साधवा.
मो.न.-- ९८२३७८६१३२२

टी. सी. हरवली आहे

नरसा कीशन गायकवाड Leving Certificate २०/०१/२०२४ रोजी या नावाची बारावी पासची मुळ टि. सी. व मार्क मेमो ४मार्च २०२४ रोजी उदगीर मुंबई दरम्यान प्रवासात हरवली आहे. सापडल्यास खालील पत्तावर संपर्क साधवा.
मो.न.- ८७७९१५२६४६

जाहीर प्रगटन (हरवले आहे)

लिहुन देणार युवराज शेषराव पवार तसेच लिहून घेणार सौ.कांचन माधव इगे रा. रेणापूर दस्त क्रमांक २१९६ मालमत्ता क्रमांक १७९६ सदरील उल्लेख असलेली प्लॉटची/घराची ओरिजिनल रजिस्ट्री तसेच आधार कार्ड, पॅन कार्ड, लाईट बिल यांचे कलर झेरॉक्स सामान खरेदीच्या पावत्या इत्यादी महत्वाची कागदपत्रे रेणापूर ते लातूर बसमध्ये प्रवासादरम्यान गुलाबी कलरच्या कॅरीबॅगमध्ये बसमधुन हरवलेली आहेत तरी कोणाला सापडल्यास त्वरित संपर्क साधावा. किंवा जवळच्या पोलीस पोलीस ठाण्यास जमा करावे ही नम्र विनंती

संपर्कासाठी पत्ता
ॲड.व्ही.एस.स्वामी औसा हनुमान मंदिर जवळ, लातूर
मोबा-९४०५७३७७७०

जाहीरनामा

लातूर येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयात

कोर्टाचा शिक्का

बारता प्रमाणपत्र क्र. १८७४/२०२३
सुनिता वि. माया
निशाणी क्रमांक ११

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा मयत प्रकाश पि. पांडूरंग सरवदे यांचा दिनांक २१.१०.२०२३ रोजी भुईसमुद्रगा, ता.जि. लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार १. सुनिता भ्र. प्रकाश सरवदे, २. प्रफुल्ल पि. प्रकाश सरवदे, ३. मोहीनी भ्र. अमोल जोंधळे व गैरअर्जदार १. माया भ्र. शरद कांबळे, २. प्रशांत पि. प्रकाश सरवदे, ३. प्रमोद पि. प्रकाश सरवदे यांनी मयत प्रकाश पि. पांडूरंग सरवदे यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांनी उपरोक्त प्रंकरणात मयत प्रकाश पि. पांडूरंग सरवदे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नोंद नोंदणी करण्यासाठी व इतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख ०७.०३.२०२४
पुढील तारीख ०८.०४.२०२४

व्ही जी गायकवाड
क लिपीक

सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व स्तर लातूर

सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

५	८	९
१४०	३७८	४५०
५२-५७	८०-८५	९१-९६

प्रो. दिपक कुमार

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

२	३९०	६	२४०	०	१४५
	४८०		२६८		२३५
	२२८		३३०		५५०
	९२-२१	३६-६७		८०-०४	

कल्याण(उदय/अस्त)

३	१३९	१	१४६	८	१२५
	२३८		४७०		२६०
	६७०		१००		४४०
	९३-३२	०१-१४		७८-८६	

ता.२७ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

उदय-अस्त		सिंगल:९-५-७ मजबुत		
130	७-४	124	जोड	40-67-91-82-75
248		467		
220		700		

कल्याणम

उदय-अस्त		सिंगल:०-३-७ मजबुत		
127	४-०	158	जोड	06-24-39-57-48
280		680		
460		455		

मुंबैम (मेन)

उदय-अस्त		सिंगल:७-१-४ मजबुत		
१७९	७-०	१४५	जोड	72-30-18-45-09
२९८		२३५		
३७७		५५०		

दिवाळी बंपर चालू आहे **99 75 47 98 26**

यशवंत

शुक्रवार दि. ८ मार्च २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

कालावधी	व्याजदर	जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर
३१ दिवस ते ४५ दिवस	६.००%	६.५०%
४६ दिवस ते १८० दिवस	७.००%	७.५०%
१८१ दिवस ते ३६५ दिवस	८.००%	८.५०%
१ वर्ष १ महिना ते २ वर्ष	९.००%	९.५०%
२ वर्ष १ महिना ते ३ वर्ष	९.२५%	९.७५%
३ वर्षापुढील मुदतीकरीता	१०.००%	१०.५०%

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

महिला वरती होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात अभाविपची निदर्शने

लातूर / प्रतिनिधी- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने पश्चिम बंगाल येथील संदेशखली भागातील महिला वरती होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात लातूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निदर्शने करून निषेध व्यक्त करणार आला.

१० फेब्रुवारी २०२४ रोजी पश्चिम बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांच्या संदेशखली भेटीमुळे या भीषण शोषणाचे सत्य व्यापक जनतेसमोर आले. पश्चिम बंगालमध्ये, सत्ताधारी पक्षाचे नेते हिंदू घरा-तील अल्पवयीन मुली आणि महिलांना जबरदस्तीने,भीतीपोटी त्यांचे अपहरण करतात आणि त्यांना तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयात आणतात आणि अत्याचार करतात असे अनेक घृणास्पद प्रकरणे उघडकीस आली आहेत.बहुतांश पीडित महिला अत्यंत मागासलेल्या आणि अनुसूचित जातीतील आहेत आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला कंटाळून अनेक कुटुंबांना संदेशखलीतून पळून जावे लागले आहे.

आई - वडिलांनी केलेल्या संस्कारामुळेच मुलांचे भवितव्य उज्वल होते : वसंत हंकारे

लातूर : आई - वडिलांच्या उत्तम, कर्तव्यकठोर संस्कारांमुळेच मुलांचे भवितव्य उज्वल घडते असे प्रतिपादन सांगलीचे विख्यात व्याख्याते वसंत हंकारे यांनी लातूर ग्रंथोत्सव २०२३ च्या कार्यक्रमात म बाप समजून घेताना म या विषयावरील व्याख्यानात केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या सोमवारच्या सायंकाळच्या सत्रात वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वात्रटिकाकार भारत सातपुते हे होते. वसंत हंकारे यांनी आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून उपस्थितांच्या काळजालाच हात घातला. त्यांच्या प्रभावी आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीने दयानंद सभागृह दणाणून गेले होते. आई

-वडिलांची महती विशद करणाऱ्या त्यांच्या वक्तव्यांनी अवघे सभागृह अक्षरशः मुसमुसणाऱ्या हुंदक्यांनी भरून गेल्याचे पाहायला मिळाले. सभागृहात उपस्थित विद्यार्थी - विद्यार्थिनी, महिला तसेच पुरुष श्रोत्यांच्या डोळ्यातही आसवांनी केल्याचे दिसून आले. आपल्या व्याख्यानाने वसंत हंकारे यांनी सर्वांची मने जिंकून घेतली.

मुलांच्या जीवनात आई - वडिलांचे स्थान किती मोलाचे आहे, हे त्यांनी विविध उदाहरणे आणि दाखल्यानी पटवून दिले. शिक्षणाने माणूस प्रगल्भ होतो, जीवनात प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान होतो. पण त्याची सुरुवात आई - वडिलांच्या संस्कारापासून होत असते. आजच्या काळात खोट्या प्रेमाच्या अमिषाला बळी पडून आपल्याला तळहाताच्या फोडाप्रमाणे सांभाळणाऱ्या आई -वडिलांना त्रास देणाऱ्या, त्यांचे मने दुखावणारी मुले - मुली जीवनात कधीही सुखी नाहीत असे सांगून वसंत हंकारे म्हणाले की, प्रत्येकाला आपली आई प्रेमळ वाटते आणि वडील रागीट , कठोर वाटतात. पण वडिलांच्या हृदयातही आईप्रमाणेच दुःखाचे भांडार असते. पण मुलांच्या उन्नतीसाठी वडील सर्व दुःख विसरून मुलांच्या समस्या - अडचणी सोडविण्यासाठी रात्रंदिवस धडपडत असतात. मुलांच्या प्रगतीसाठी किती कष्ट उपासतो, अशा वडिलांच्या अनेक गोष्टी वास्तवात कधी मुलांपर्यंत पोहचतच नाहीत. कारण बाप त्या आपल्या मुलांना कधी कळूच देत नाही. यामागे बापाची मानसिकता केवळ एवढीच असते आपल्या मुलाने आयुष्यात प्रगती करावी, यश मिळवावे, आपल्यासारखे कष्ट मुलाच्या वाट्याला येऊ नये. त्याकरिता आजच्या मुला - मुलींनी आई - बापाच्या कष्टाची जाणीव ठेवावी. बाप समजून बापाला घट्ट मिठी मारून पहा म्हणजे बाप काय आहे ते कळेल,असेही हंकारे यांनी सांगितले. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून लातूरकरांना चांगल्या बौद्धिक मेजवानीचे सोय जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के आणि त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांनी उपलब्ध करून दिल्याच्या प्रतिक्रिया यावेळी उपस्थितांच्या तोंडातून बाहेर पडताना ऐकायला मिळाल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम मेकले , प्रभाकर कापसे, हरिश्चंद्र डेंगळे, हिरालाल पाटील,राम मोतीपवळे काशिनाथ बोडके, अनिल पाटिल,संजय सुर्यवंशी,श्रीधर स्वामी, गुप्तलिंग स्वामी सि.पी.पाटिल, आत्माराम कांबळे, संतोष करमले, सुशिल मेकले, यांसह जिल्हा ग्रंथालय संघाचे पदाधिकारी परिश्रम घेतले.

महिलांचा आदर सत्कार हीच भारतीय संस्कृती: गजानन शिंदे

देवणी प्रतिनिधी: - जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने देवणी तहसील कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्तबगार महिलांचा महसूल विभाग देवणी चे तहसीलदार गजानन शिंदे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला त्यावेळी महिलांना मार्गदर्शन करतांना महिलांचा आदर सत्कार करणे हीच भारतीय संस्कृती आहे म्हणून महिलांचा सन्मान व्हावा त्यांनी करीत असलेल्या कार्याला प्रेरणा मिळाली म्हणून सत्कार करणे काळाची गरज असल्याचे ही यावेळी सांगितले.

१९७५ साली या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याच ठरविलं १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीनं विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा यासाठी आव्हान केले म्हणून महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या समर्थनार्थ दर वर्षी ८मार्च हा दिन साजरा करण्यात येत असल्याचे या प्रसंगी सांगितले यावेळी तहसीलदार गजानन शिंदे नायब तहसीलदार राहुल पत्रिके ,पेशकार माधवराव साळुंके, अव्वल कारकून रितेश कवरे ,पदमसिंग गोटमुकले क्लार्क सुग्रीव बिरादार श्रीमती अनुजा पानसरे, भाग्यश्री सूर्यवंशी, भाग्यश्री मोघे, अनुराधा विभूते, कोळे मॅडम यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

आत्मसात केलेल्या ज्ञान आणि कौशल्याचा पशुसखीनी प्रसार करावा :डॉ. नंदकुमार गायकवाड

उदगीर / प्रतिनिधी- ग्रामीण कुटुंबात शेळीसंगोपनाची बहुतांश जबाबदारी महिलाकडेच असते. त्यामुळे विस्तार उपक्रमात महिलांची सहभागिता वाढविणे आवश्यक आहे. शेळीपालन महिलाना सहजसाध्य असून त्यातून आत्मनिर्भरता सहज शक्य आहे. पशुसखीनी आत्मसात केलेले ज्ञान आणि कौशल्याचा इतर महिला शेळीपालकापर्यंत पोहोचवावे असे प्रतिपादन मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. नंदकुमार गायकवाड यांनी केले.

बीड जिल्ह्यातील पशुसखीसाठी उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सांगता समारोप प्रसंगी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. दूरस्थ प्रणालीद्वारे प्रकल्प प्रमुख तथा संचालक, विस्तार संचालक, माफसू, नागपूर यांनी पशुसखींना संबोधित करतांना म्हटले की, शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून उत्पादकता वाढविणे आणि कुटुंबाची सामाजिक-आर्थिक उन्नती साधने महिला सक्षमीकरणातून शक्य असल्याचे म्हटले. माविम तर्फे याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्हा समन्वय अधिकारी एस. बी. चिंचोलीकर यांनी मनोगत व्यक्त करताना प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले. समारोप कार्यक्रमास परभणी येथून दूरस्थ प्रणालीद्वारे प्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख मार्गदर्शन करतांना म्हटले की पशूधन क्षेत्रातील तंत्रज्ञानाबाबत जनसामान्यात असलेली अनिश्चितता कमी करण्यासाठी पशुसखीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार असल्याचे आपल्या मार्गदर्शनात म्हटले.

माफसू, नागपूर व महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य करारानुसार ङ्महाराष्ट्रातील शेळी व कुक्कुटपालन करणा-या महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी पशुसखी व प्रशिक्षक महिलांचा क्षमता विकासफ या प्रकल्पाअंतर्गत दि.२६ फेब्रुवारी ते ०६ मार्च २०२४ दरम्यान पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे पशुसखीसाठी शेळीपालन या विषयावर दहा दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. प्रकल्प सह-समन्वयक तथा प्रशिक्षण समन्वयक डॉ. नरेन्द्र खोडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात महाविद्यालयात राबविलेल्या लातूर, धारशिव, नांदेड आणि बीड जिल्ह्यातील एकूण ११९ पशुसखीच्या चार प्रशिक्षणाबाबत आढावा मांडला.

प्रशिक्षण सह-समन्वयक डॉ. शरद आव्हाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तर डॉ. राम कुलकर्णी यांनी प्रशिक्षण आयोजनात व्याख्यात्यांचे तसेच थेट वा अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार प्रकट केले. रेखा वेडे, ताई सिरसाट, कालिंदा अलगुडे, राणी कोरडे,

आणि वैष्णवी नाईकनवरे या पशुसखीनी मनोगत व्यक्त करताना प्रशिक्षणादरम्यान त्यांना आलेले अनुभव व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अय्यान पाटील, संकेत नरवाडे, श्याम सावंडकर आणि अक्षय चिलमे या पदव्युत्तर विद्यार्थ्यानी प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनात मोलाची भूमिका साकारली.

महाशिवरात्रीनिमित्त वैद्यनाथाच्या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रांग लागली

परळी; महाशिवरात्रीनिमित्त देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी गुरुवारी विजया भागवत एकादशी दिवशी भाविकांची रांग लागली होती. हजारो भाविकांनी श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतले.येथील श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्ट वतीने तीन दिवसीय महाशिवरात्र यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आठ मार्च रोजी महाशिवरात्रीचे श्री वैद्यनाथ बप्पाचे लाखो भाविकांची दर्शन सुलभ व्हावे व गर्दीचे नियमन व्हावे यासाठी श्री वैजनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे.

दर्शनासाठी तीन रांगा . श्री वैद्यनाथ मंदिरात धर्मदर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांच्या पुरुष व महिला अशा दोन वेगळ्या रांगा लावण्यात येणार आहे. तसेच पासधारकांची स्वतंत्र रांग राहणार आहे. ७ मार्च गुरुवारी रात्री १२ ते ८ मार्च शुक्रवारी रात्री १२ पर्यंत महाशिवरात्रीचे दर्शन घेता येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रुद्राभिषेक .८ मार्च रोजी रात्री ६ ते ८ पर्यंत श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते श्री वैद्यनाथास रुद्रअभिषेक करण्यात येणार आहे त्यानंतर भाविकांना अभिषेकास परवानगी देण्यात येणार आहे .

रविवारी पालखी मिरवणूक रविवारी दिनांक १० मार्च रोजी श्री वैद्यनाथांची पालखी श्री वैद्यनाथ मंदिरातून सवाद्य मिरवणुकीने निघणार आहे व सायंकाळी प्रसिद्ध गायिका प्रज्ञाताई देशपांडे व पंडित केतन अत्रे (पुणे)यांचा भक्ती गीत व अभंगवाणी चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तसेच आंबेवेस येथे रात्री नऊ वाजता शोभेची दारू उडविण्यात येणार आहे त्यानंतर गणेशपार,नांदुरवेस व गोपनपाळे गल्ली येथे कलावंतांची हजेरी होईल. अंबेवेस, भोईगल्ली मार्गे रात्री मिरवणुकीने पालखी मंदिरात येईल. दिनांक ११ मार्च रोजी दहा ते एक पर्यंत मानाची बिदागी वाटपाचा कार्यक्रम होणार आहे . अशी माहिती श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा परळी तहसीलदार व्यंकटेश मुंडे व सेक्रेटरी प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी दिली .

लाखो भाविकांना दर्शन घेणे सुलभ व्हावे म्हणून श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने वैद्यनाथ मंदिराच्या पायऱ्यावर लोखंडी बॅरिकेट्स उभारण्यात आल्या असून भव्य मंडप उभारण्यात आला आहे. सुरक्षेसाठी मंदिराच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परळीत पशु , अश्रव ,व श्रवान प्रदर्शन ... महाशिवरात्रीनिमित्त परळी येथील तहसील कार्यालयाच्या समोरील प्रांगणात जिल्हा परिषद बीड, पंचायत समिती परळी , नगरपरिषद ,कृषी उत्पन्न बाजार समिती व नाथ प्रतिष्ठान परळी यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता भव्य विभाग स्तरावर पशु, अश्रव व श्रवान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये सहभागी झालेल्या पशुधनास आकर्षक पारितोषिक देण्यात येणार आहे अशी माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे व पशुसंवर्धन विभागाचे डॉ पी एल आघाव यांनी दिली आहे . या पशुप्रदर्शनात सांगली, सातारा सोलापूर ,नाशिक, लातूर ,नांदेड ,परभणी बीड जिल्ह्यातील पशु सहभागी होतील असे डॉ. आघाव यांनी सांगितले शहरातील नाथरोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेत राहट पाळणे व आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले आहे .

जगमित्र नागा मंदिर व सुर्वे श्रवर मंदिर मध्ये कार्यक्रम शहरातील वैद्यनाथ मंदिर रोडवरील श्री संत जगमित्र नागा मंदिरातही महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे गुरुवारी मंदिर भाविकांच्या गर्दीने फुलले होते. शहरातील सुर्वे श्रवर मंदिरातही शिवलीलामृत पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे .

मनसेच्या ठिय्या आंदोलनानंतर राशनच्या वाहतूक कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याचे तहसिलदार यांचे आदेश

जळकोट : प्रतिनिधी- जळकोट तहसील गोदामातुन राशनच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्या वाहतूक कंत्राटदारवर जीवनावश्यक वस्तू कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी मनसेचे प्रदेश सरचिटणीस संतोष नागरगोजे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली जळकोट तहसील कार्यालयाच्या गेटला तीव्र ठिय्या आंदोलन ता. ७ रोजी करण्यात आले. तहसिलदार सुरेखा स्वामी यांनी संबंधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतरच आंदोलन स्थगित करण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात नायब तहसीलदार, गोदामपाल, वाहतूक कंत्राटदाराकडुन संगनमताने रेशनच्या धान्याचा अपहार केला जातो ही बाब महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ता. २३जाने. रोजी जिल्हाधिकारी,लातूर तसेच रेणापुर, उदगीर ,जळकोटसह जिल्हातील सर्व तहसीलदारांना निवेदन देण्यात आले होते. जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर यांनाही ता. ५ मार्च रोजी निवेदन देवुन हा राशनचा काळाबाजार थांबवण्या संदर्भात विनंती केली होती . पण वारंवार निवेदने देवुन पाठपुरावा करून जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासनाकडुन कसलीही कार्यवाही होत नसल्याने ता. ६ मार्च रोजी जळकोट तहसील कार्यालयाच्या स्वस्त धान्य दुकानाच्या गोडाऊन मधून घोणसी राशन दुकानावर जाणाऱ्या वाहनास (वाहन क्रमांक एम. एच. - २४ ,जे ९६६६) थांबून मनसे कार्यकर्त्यांनी वाहनाची तपासणी केली असता वाहनातील धान्याच्या प्रत्येक कट्टयामध्ये दोन ते तीन किलो धान्य कमी आढळून आले. त्यावरून गोडाऊनपाल व अतिरिक्त नायब तहसिलदार पुरवठा हिप्परगे जी. एस. यांच्या समक्ष विचारणा केली असता त्यांनी स्वतः त्या वाहनाची तपासणी केली. ज्यामध्ये एकूण २२ कट्टयाचे वजन करण्यात आले. त्या संदर्भाने गोडाऊनपाल हिप्परगे यांनी सदरील वाहनाचा पंचासमक्ष पंचनामा केला त्यात वजन केलेल्या कट्टयाचे वजन कमी आढळून आले. तसेच वाहतूक कंत्राटदाराला ठेका देत असताना महाराष्ट्र शासनाने जे नियम घालून दिलेले आहेत, त्या कोणत्याही नियमाचे पालन वाहतूक कंत्राटदाराकडून होताना दिसून आले नाही. त्यामध्ये वाहनांमध्ये वजन काटा असणे वाहनास हिरवा रंग नसणे, वाहन चालक मदतनीस हमाल यांचे विमा उतरवलेले नसणे अशा कुठल्याही नियमाचे पालन वाहतूक कंत्राटदारा कडुन होताना दिसून आले नाही.

सदरील राशनच्या धान्याचा अपहार करून जीवनावश्यक वस्तू कायद्याची पायमल्ली करण्यात आली आहे तरी दोषी अधिकाऱ्यांवर व वाहतूक कंत्राटदारवर जीवनावश्यक वस्तू कायद्या १९५५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. या मागणीसाठी हे आंदोलन तब्बल पाच तास चालल्यानंतर तहसीलदार जळकोट यांनी पोलिस निरीक्षक जळकोट यांना दोषी वाहतूक कंत्राटदार विरोधात फिर्याद देवुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर सदरील आंदोलन मागे घेण्यात आले. काल रात्री उशिरा पर्यंत संबंधीत कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती.

यावेळी जळकोट तालुकाध्यक्ष महेश देशमुख, उदगीर तालुकाध्यक्ष संग्राम रोडगे, लातुर शहराध्यक्ष मनोज अभंगे, उदगीर शहराध्यक्ष संतोष भोपळे , रामदास पाटील, दिनेश पवार, शुभम चंदनशिवे, सुनिल तोंडचिरकर, संग्राम केंद्रे,अंकुश नागपुर्णे, गजानन पद्मपल्ले, मधुकर बादुलगे ,शंकर परगेवार,परमेश्वर धोंडापुरे, भानुदास राजेकर,रणजित मालुसरे, राहुल देवकत्ते, धनराज गोंड, रोहित बोईनवाड, दिपक करक्याळे,करणं नागराळे, आरविंद बामणे,फिरोज पिंजारी आदी उपस्थित होते.

जळकोट पं. स. ला पंचायतराजचा ८ लाखाचा पुरस्कार

माधव होनराव

जळकोट : - राज्य शासनाच्या यशवंत पंचायतराज अभियान सन २०२२ - २३ मधील विभागस्तरीय द्वितीय पुरस्कार व आठ लाख रु. चे पारितोषिक पंचायत समिती जळकोटला विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या हस्ते आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे ता. ५ मार्च रोजी प्रदान करण्यात आला.

या सत्कार समारंभास पंचायत समिती जळकोटचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार , उपअभियंता शशिकांत उरगुंडे (बांधकाम), कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन काडवादे, विस्तार अधिकारी शिवकांत पटवारी, ग्रामसेवक दिनकर कबाडे, वरिष्ट सहायक नितीन मुस्कावाड, कनिष्ठ सहायक शिंदीकुमठे वैजनाथ, तालुका व्यवस्थापक रवी कलवले, स्वामी शिवराज तंत्रिक अधिकारी उपस्थित होते.

जळकोट पंचायत समितीला यशवंत पंचायतराजचा पुरस्कार मिळाल्याबद्दल अनमोल सागर मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. लातूर, तडवी असलम अतिरिकत् मुख्य कार्यकारी अधिकारी , नितीन दाताळ उप मुख्य कार्यकारी अधिकारी , दत्तात्रय गिरी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जळकोट पं. स. चे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.